
## छत्तीसगडमध्ये ३१ नक्षलवाद्यांचा खात्मा, शस्त्रसाठा जप्त



**रायपूर** : नक्षलवादविरोधी मोहिमेत सुरक्षा दलांना मोठे यश मिळाले आहे. छत्तीसगडमधील करेगुट्टा टेकडीवर चाललेल्या कारवाईत पोलिसांनी केंद्रीय दलाच्या सहकार्याने ३१ नक्षलवाद्यांचा खात्मा केला, तर त्यांचे १५०हून अधिक बंकरही नष्ट केले. याशिवाय वेगवेगळ्या ठिकाणांहून मोठ्या प्रमाणात शस्त्रे आणि दारूगोळाही जप्त करण्यात आला आहे. छत्तीसगडचे डीजीपी अरुण देव गौतम आणि सीआरपीएफ डीजी यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. कठीण भौगोलिक परिस्थिती असूनही करेगुट्टा टेकडीवर हे ऑपरेशन २१ दिवस चालू होते. मारल्या गेलेल्या नक्षलवाद्यांवर १.७२ कोटी रुपयांचे बक्षीस जाहीर करण्यात आले होते. या कारवाईत महिला नक्षलवादीदेखील मारल्या गेल्या. दरम्यान, कारवाईदरम्यान सुरक्षा दलांचे १८ सैनिकही जखमी झाले असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.


रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक २९७
www.ramprahar.com

गुरुवार, १५ मे २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२


### अंतरंग


विकसित महाराष्ट्र व्हिजन डॉक्युमेंटच्या प्रारूपावर चर्चा/२

केकला टरबूज (कलिंगड) एक उत्तम पर्याय/४

फणसाड अभयारण्यात बिबटे, रानगव्यांची संख्या वाढली/५


# भारतीय सैन्याच्या सन्मानार्थ तिरंगा रॅली

## ‘ऑपरेशन सिंदूर’द्वारे लष्कराने ताकद दाखवून दिली –मुख्यमंत्री

**मुंबई : प्रतिनिधी**

पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद्यांविरोधातील भारतीय लष्कराचे ‘ऑपरेशन सिंदूर’ यशस्वी ठरले. या यशानंतर भाजपकडून देशाच्या वेगवेगळ्या भागात तिरंगा यात्रेचे आयोजन केले जात आहे. मुंबईतही भारतीय सैन्याच्या सन्मानार्थ ऑगस्ट क्रांती मैदान ते स्वराज्य भूमी, गिरगाव चौपाटी येथे बुधवारी (दि. १४) तिरंगा यात्रा काढण्यात आली होती.

या तिरंगा यात्रेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह मंत्री, नेते, पदाधिकारी आणि हजारो मुंबईकर सहभागी झाले होते.

या वेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी सुन ले बेटा पाकिस्तान, बाप हे तेरा हिंदुस्तान असे म्हणत जोरदार घोषणाबाजी केली. ते म्हणाले, तिरंगा यात्रेच्या माध्यमातून आम्ही आमच्या सैन्याचे आभार मानण्यासाठी एकत्र जमलो आहोत. ऑपरेशन सिंदूरद्वारे भारतीय सैन्याने आपली ताकद दाखवून दिली.



पहलगाममध्ये धर्म विचारून लोकांना मारण्यात आले, कुटुंबियांसमोर मारण्यात आले. असे हत्याकांड जगाच्या इतिहासात पहायला मिळाले नव्हते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारतीय सैन्याने ऑपरेशन सिंदूर लाँच केले. बहिणींचे कुंकू पुसण्याचे काम दहशतवाद्यांनी केले होते, त्यांना नेस्तनाबूत करण्याकरिता ऑपरेशन सिंदूरची सुरुवात झाली. पाकिस्तानमध्ये घुसून भारतीय सैन्याने दहशतवाद्यांचे नऊ अड्डे उद्ध्वस्त केले. मला सर्वात जास्त आनंद कशाचा असेल तर ज्या ठिकाणी कसाबने प्रशिक्षण घेतले तो अड्डादेखील नेस्तनाबूत करण्यात आला. मुंबईच्या अपराध्यांना ठोकण्याचे काम सैन्याने केले, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री पुढे म्हणाले, पाकिस्तानमध्ये जिथे दहशतवाद्यांसाठी सेफ हाऊस तयार केले होते तिथेच भारतीय सैन्याने जाऊन त्यांना ठोकले. सर्व अड्डे उद्ध्वस्त केले. तुम्ही कुठेही गेलात तरी आम्ही तुम्हाला सोडणार नाही, घुसून मारू हे भारतीय सैन्याने दाखवून दिले. पाकिस्तानचा एकही हल्ला यशस्वी होऊ शकला नाही. पाकिस्तानला युद्धबंदी करायची असेल तर त्यांनी आमच्यासमोर गुडघे टेकावेत असे भारताने सूचित केले. सैन्य अधिकाऱ्यांनी फोन करून आम्हाला विनंती करावी, तरच आम्ही युद्धबंदी करू असे सांगितले. विनंती केल्यानंतर ही युद्धबंदी झाली.

## महाराष्ट्राचे सुपुत्र भूषण गवई देशाचे नवे सरन्यायाधीश



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

न्यायाधीश भूषण रामकृष्ण गवई यांनी भारताचे ५२वे सरन्यायाधीश म्हणून बुधवारी (दि. १४) शपथ घेतली. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी राष्ट्रपती भवन येथे त्यांना शपथ दिली.

२४ नोव्हेंबर १९६० रोजी जन्मलेले बी.आर. गवई महाराष्ट्रातील अमरावती येथील रहिवासी आहेत. सामाजिक कार्यकर्ते आणि बिहार व केरळचे माजी राज्यपाल दिवंगत रा.सु. गवई यांचे ते पुत्र आहेत. त्यांनी यापूर्वी या क्षेत्रात अनेक ठिकाणी काम पाहिले आहे. ते २३ नोव्हेंबरपर्यंत सरन्यायाधीश म्हणून काम पाहतील.

## राज्यातील शाळांसाठी नवी नियमावली जाहीर

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र सरकारने लहान मुलांचे लैंगिक शोषण थांबवण्यासाठी राज्यातील शाळांसाठी नवी नियमावली जाहीर केली. त्यानुसार राज्यातील प्रत्येक शाळेत सीसीटीव्ही कॅमेरा बसवणे अनिवार्य असेल. याशिवाय शालेय कर्मचाऱ्यांची तपासणी आणि बसचालकासह इतर कर्मचाऱ्यांची नियमितपणे अल्कोहल चाचणी बंधनकारक करण्यात आली आहे.

बदलापूरमधील एका नामांकित शाळेत दोन चिमुकलींवर अत्याचार करण्यात झाला होता. या पार्श्वभूमीवर शाळांमधील सुरक्षा वाढवण्यासाठी हे नवीन नियम बनवण्यात आले आहेत. महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण विभागाने १३ मे रोजी एक जीआर जारी केला. त्यानुसार शक्य असल्यास पूर्व–प्राथमिक ते इयत्ता सहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी महिला शिक्षकांची नियुक्ती करावी. प्रत्येक स्कूल बसमध्ये एक महिला कर्मचारी असणे अनिवार्य आहे. शाळेच्या आवारात १०९८ हा चाइल्ड हेल्पलाइन क्रमांक भागात लावावा. मानसिक दबावाखाली असलेल्या किंवा त्रासलेल्या विद्यार्थ्यांसाठी समुपदेशन सत्रांचे आयोजन करावे. लहान मुलांना ‘गुड टच’ आणि ‘बॅड टच’ बद्दल माहिती द्यावी.

शाळेत कोणताही गुन्हा घडल्यास त्याची माहिती स्थानिक पोलिसांना किंवा बाल कल्याण पोलीस विभागला देणे बंधनकारक आहे. नियमांचे पालन न केल्यास सरकारी अनुदान रोखणे किंवा शाळेची मान्यता रद्द करणे यासारखी कारवाई केली जाऊ शकते.






पनवेल : संघटन कौशल्य, कार्यक्षमता व पक्षशिस्तीसाठी परिचित असलेले अविनाश कोळी यांची भारतीय जनता पक्षाच्या उत्तर रायगड जिल्हा अध्यक्षपदी पुनर्नियुक्ती करण्यात आली आहे. याबद्दल माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर, महानगरपालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी कोळी यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. (अधिक छायाचित्रे पान ३ वर..)

## प्रेयसीची हत्या करून प्रियकराची आत्महत्या

### सुधागडात प्रेम प्रकरणाचा भयानक अंत

**पाली : प्रतिनिधी**

प्रेम प्रकरणाच्या वादातून प्रियकराने प्रेयसीची हत्या करून स्वतःलाही संपवल्याची खळबळजनक घटना सुधागड तालुक्यातील परळी येथील एका खासगी दवाखान्यात घडली. पोर्णिमा अनंत देसाई, (वय २२, रा. देसाईपाडा, ता. सुधागड) आणि शेखर संतोष दुधाणे (वय २६, रा. दुधाणेवाडी, ता. सुधागड) अशी या घटनेत करूण अंत झालेल्यांची नावे आहेत.



शेखर दुधाणे आणि पोर्णिमा देसाई यांच्यात प्रेमसंबंध होते. पोर्णिमा ही परळी येथील डॉ. राजेंद्र पॉलीक्लिनिक नर्सिंग होम या दवाखान्यात नर्स म्हणून काम करीत होती, मात्र अलीकडच्या काही दिवसांपासून ती टाळाटाळ करीत असल्याचा राग मनात धरून शेखरने नर्सिंग होममध्ये जाऊन गळा व दोन्ही मनगटावर कोयत्याने वार करून तिची हत्या केली. त्यानंतर शेखरने त्याच खोलीत बेडशीटच्या सहाय्याने गळफास घेऊन स्वतःचेही जीवन संपविले.

जांभूळपाडा, पाली पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी पोहचून पंचनामा केला. या वेळी दवाखान्याबाहेर नागरिकांची मोठी गर्दी जमली होती. या घटनेचा अधिक तपास पाली पोलीस करीत आहे.

## खोपोलीत वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस



**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

वादळी वाऱ्यासह आलेल्या अवकाळी पावसाने खोपोलीत बुधवारी (दि. १४) धुमाकूळ घातला. जोरदार पावसामुळे सखल भागात पाणी तुंबून जनजीवन विस्कळीत झाले.

ढगांचा गडगडाट, विजेचा लखलखाट आणि वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने खोपोलीकरांना अक्षरशः झोडपून काढले. शहरातील शास्त्रीनगर, डीसी नगर व इतर भागात रस्त्यावर पाणी आल्याने वाहतूक मंदावली. सिद्धार्थनगर भागाचा तर संपर्क तुटला. नवीन पुलाचे काम सुरू असलेले साहित्य नदीपात्रात वाहून गेले.

### जनजीवन विस्कळीत

गटारे तुंबल्याने मार्गावर पाणीच पाणी झाले तसेच काही दुकानात पाणी शिरल्याने दुकानदारांचा माल पाण्यात भिजून नुकसान झाले. पावसामुळे सायंकाळी घरी परतणाऱ्या चाकरमान्यांची त्रेधातिरपिट उडाली, तर खोपोली रेल्वेस्थानक परिसरात पाणी तुंबल्याने तेथून वाट काढताना प्रवाशांची कसरत झाली. सुमारे तासाभराच्या पावसामुळे खोपोलीतील जनजीवनावर परिणाम झाल्याचे दिसून आले.







# व्हिजन डॉक्युमेंटसंदर्भात नागरिकांच्या सूचना मागवा -मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## विकसित महाराष्ट्र २०४७ व्हिजन डॉक्युमेंटच्या प्रारूपावर प्राथमिक चर्चा





**मुंबई : प्रतिनिधी**

नीती आयोगाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार तयार करण्यात येत असलेल्या 'विकसित महाराष्ट्र २०४७ व्हिजन डॉक्युमेंट'चे प्रारुप कसे असावे या संदर्भात आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत प्राथमिक चर्चा करण्यात आली. व्हिजन डॉक्युमेंटसंदर्भात नागरिकांच्या सूचना मागविण्याचे निर्देश यावेळी मुख्यमंत्र्यांनी दिले.

'विकसित महाराष्ट्र २०४७ व्हिजन डॉक्युमेंट' बाबत सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या बैठकीत सादरीकरण झाले. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मुख्य सचिव सुजाता सौनिक यांच्यासह विविध विभागांचे सचिव उपस्थित होते.

नीती आयोगाने 'विकसित भारत २०४७' चा आराखडा तयार केला आहे. यानुसार महाराष्ट्रानेही व्हिजन डॉक्युमेंट तयार करावे, अशा सूचना आयोगाने दिल्या होत्या. त्यानुसार राज्याचे व्हिजन डॉक्युमेंट तयार करण्यात येत असून त्याचे प्रारुप कसे असावे, त्यामध्ये काय समाविष्ट असावे याबद्दल बैठकीत चर्चा झाली. या व्हिजन डॉक्युमेंटचा पहिला प्रारुप आराखडा १५ ऑगस्टपर्यंत केंद्र सरकारकडे सादर करायचा असून अंतिम आराखडा हा २ ऑक्टोबर २०२५ पर्यंत सादर करावयाचा आहे.

प्रगतीशील, शाश्वत, सर्वसमावेशक व सुशासन यावर आधारित राज्याचे व्हिजन डॉक्युमेंट तयार करावे. तसेच हा आराखडा अंमलात आणण्याजोगा असावा. व्हिजन डॉक्युमेंट तयार करण्यासाठी सर्व प्रशासकीय अधिकाऱ्यांनी आपल्या ज्ञानानुसार योगदान दिल्यास हे उत्कृष्ट डॉक्युमेंट तयार होईल. त्यासाठी सर्व अधिकाऱ्यांनी सक्रिय सहभाग घ्यावा, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

व्हिजन डॉक्युमेंटसंदर्भात नागरिकांची मते जाणून घ्यावीत. यासाठी व्हॉट्सप चॅट-बॉट, ऑनलाईन सर्व्हे आदी माध्यमांचा उपयोग करावा. तसेच व्हिजन डॉक्युमेंटचा लोगो तयार करण्यासाठी नागरिकांसाठी स्पर्धा ठेवावी, अशा सूचनाही मुख्यमंत्री यांनी यावेळी दिल्या. व्हिजन डॉक्युमेंट तयार करण्यासाठी सहकार्य करणाऱ्या मॅकेन्झी या संस्थेच्या प्रतिनिधींनी यावेळी सादरीकरण केले.

## खालापुरात आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिर

**खोपोली, चौक : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण रायगड अलिबाग यांनी उपनियंत्रक नागरी संरक्षण दल उरण यांचे पथकामार्फत खालापूर तालुक्यात आज आपत्ती व्यवस्थापन विषयाचे एक दिवसीय प्रशिक्षण शिबिराचे आयोजन सरनौबत नेताजी पालकर सभागृह येथे आयोजित केले होते.

या शिबिराचे उद्घाटन खालापूर तालुक्याचे तहसीलदार अभय चव्हाण यांचे हस्ते झाले तर प्रास्ताविक नायब तहसीलदार सुधाकर राठोड यांनी केले. नागरी संरक्षण दल उरणचे प्रशिक्षक शशिकांत शिरसाट यांनी शिबिरार्थींना युद्धजन्य परिस्थितीत कोणकोणत्या उपाययोजना राबवाव्यात याबाबतीत तंत्रशुद्ध मार्गदर्शन करताना दृकश्राव्य प्रणालीचा वापर केला. आपत्तीचे विविध प्रकार विस्तृतपणे समजावून सांगताना प्रात्यक्षिकासह प्रशिक्षण दिले. प्रथमोपचार



आणि कोणत्या प्रसंगी कसे मदतकार्य करायचे याबाबतीत प्रशिक्षणार्थींना सहभागी करून मार्गदर्शन केले.

कोणत्याही आपत्तीला सामोरे जाण्यासाठी मनाच्या तयारी सोबत तांत्रिक बाबींचे ज्ञान असणे आवश्यक असल्याने अशा शिबिराचे आयोजन केल्याचे तहसीलदार अभय चव्हाण यांनी या शिबिरानंतर शिबिरार्थींची सामाजिक जबाबदारी वाढली असल्याची जाणीव करून दिली.

खालापूर तालुक्यातील महसूल कर्मचारी, खोपोली नगर परिषदेचे अधिकारी आणि कर्मचारी,फायर ब्रिगेडचे सदस्य, व पोलीस पाटील, यांनी या प्रशिक्षण शिबिरात भाग घेतला.

## कासाडी नदी पुनरूज्जीवन प्रकल्पाची पाहणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेमार्फत तळोजा औद्योगिक परिसर आणि गावांना जोडणाऱ्या कासाडी नदीच्या संवर्धनासाठी 'कासाडी नदी पुनरूज्जीवन प्रकल्पांतर्गत प्रत्यक्ष पाहणी दौरा' बुधवार दिनांक. १४ मे रोजी आयुक्त तथा मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिका अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे यांनी केला.



सदर पाहणी दौऱ्यांवेळी महापालिका उपायुक्त स्वरूप खारगे, शहर अभियंता संजय कटेकर, उप अभियंता विलास चव्हाण, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे डॉ.विक्रांत भालेराव, जलसंपदा उप अभियंता अमित पारळे, सार्वजनिक बांधकाम कनिष्ठ अभियंता मेंगाळ, एमआयडीसी प्रतिनिधी दिलीप बोबडे-पाटील आदी उपस्थित होते.

पनवेल महानगरपालिका हद्दीतील तळोजा औद्योगिक परिसर आणि गावांना जोडणाऱ्या कासाडी नदीच्या संवर्धनासाठी महानगरपालिकेने पाऊले उचलेली आहेत. त्यानुषंगाने आयुक्त चितळे यांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांशी याविषयी चर्चा करून या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. कासाडी नदीच्या संवर्धनासाठी योग्य ती उपाययोजना करण्याकरिता नियोजनाची जबाबदारी महापालिकेस देण्यात आली आहे, या अनुषंगाने लवकरच आराखडा तयार करण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर ही बैठक महत्वाची होती.

कासाडी नदी संवर्धनासाठी रायगड जिल्हाधिकारी यांनी सूचना केल्या आहेत. या पत्रानूसार कासाडी नदी पुनरूज्जीवीत करण्यासाठी विविध आस्थापनांसोबत आज पाहणी दौरा आयोजित करून प्रत्यक्ष नदी पात्राची पाहणी करण्यात आली. यावेळी अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे यांनी सदर नदी पुनरूज्जीवीत करण्यासाठी संयुक्तपणे कार्यवाही करताना संबंधित आस्थापनांना विविध निर्देश दिले.

पनवेल महानगरपालिका हद्दीमधील प्रदूषित कासाडी नदीचे पुनरूज्जीवन करण्याच्या उद्देशाने विविध कंपन्यांकडून नदी पात्रात सोडण्यात येणाऱ्या सांडपाण्यावर देखरेख करून त्याच स्क्रीनींग करण्याविषयीचे निर्देश संबधित आस्थापनाना देण्यात आले.

गणेश घाट, तोंडरे येथील नदी पात्रात अनधिकृतरित्या कंपनीद्वारे, टँकरने केमिकलयुक्त पाणी, सांडपाणी सोडले जाते. अशा कंपन्या , टँकरवर कारवाई करण्याबाबत महाराष्ट्र प्रदूषण मंडळास सूचित करण्यात आले.

गणेश घाट, तोंडरे येथील नदी पात्रात 'स्मॉल चेन ऑफ बंधारे' बांधणेबाबत नियोजन करणे, काप्रेचार्य मंदिर, नावडे येथे भरतीच्या वेळी नदीचे पाणी गावामध्ये घुसू नये यासाठी गॅबियन वॉल बांधणेबाबत नियोजन करण्याबाबत महापालिकेच्या अधिकाऱ्यांना अतिरीक्त आयुक्तांनी निर्देश दिले.

कासाडी नदीच्या नदीचा मूळ प्रवाह उन्हाळयात देखील प्रवाहीत राहील या दृष्टीने नदीमधील अडथळे काढून टाकण्याबाबत,तसंच कासाडी नदीतील केमिकलयुक्त पाणी सी.ई.टी.पी. ला ट्रान्सफर करून त्यावर प्रक्रिया करणेस्तव नियोजन करणे, एम.आय.डी.सी. हद्दीतील रस्त्याच्या बाजूला उभे करण्यात येणाऱ्या टँकरवर कारवाई करण्याबाबत एमआयडीसी आस्थापनांना अतिरीक्त आयुक्तांनी निर्देश दिले.

गणेश घाट, तोंडरे येथील नदी पात्रात करण्यात आलेल्या अनधिकृत बांधकामावर कारवाई करण्याबाबत जलसंपदा विभागास सूचित करण्यात आले.तर कासाडी नदी पात्रात अनधिकृतरित्या कंपनी , टँकरद्वारे केमिकलयुक्त पाणी ,सांडपाणी सोडले जाऊ नये यास्तव ठिकठिकाणी सोलार बेस सी.सी.टी.व्ही कॅमेरे लावण्याबाबत श्री.शेटे यांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास निर्देश दिले.

या वेळी पर्यावरण विभाग प्रमुख मनोज चव्हाण, टी. आय. ए. सतिश शेट्टी, सुनिल पडलानी, प्रभाग अधिक्षक जितेंद्र मढवी, सहाय्यक अभियंता औदुंबर अलाट, सहाय्यक अभियंता एच.एन. सरग, सहाय्यक अभियंता निवृत्ती चंदेवाड उपस्थित होते.

## मांडवा सागरी पोलिसांचे मॉक ड्रील यशस्वी

### आपत्कालीन परिस्थितीची रंगीत तालीम

**अलिबाग : प्रतिनिधी**

गेट वे ऑफ इंडिया येथून मालदार कंपनीची प्रवासी बोट सुमारे १८० प्रवासी घेऊन मांडवा बाजूकडे निघालेले असता बोटीत कासा खडकाजवळ दोन दहशतवादी घुसले व त्यांनी सदरची बोट ताब्यात घेतलेली आहे, अशी माहिती मिळताच पोलीसांनी मोठी कारवाई करत दोघाही दहशतवाद्यांना ताब्यात घेतले. दोन अतिरेकी पोलिसांनी पकडले याची माहिती मिळताच एकच खळबळ उडाली होती. मात्र ही प्रत्यक्ष घटना नसून मांडवा सागरी पोलिसांमार्फत मॉक ड्रील घेण्यात आल्याचे लक्षात आल्यावर नागरिकांनी सुटकेचा श्वास सोडला.

मुंबई शहरासह लगतच्या शहरांमधील दहशतवादी कारवाया पाहता भविष्यात हल्ला होण्याची शक्यता लक्षात घेऊन रायगड जिल्ह्यासहित महाराष्ट्र राज्यातील समुद्र किनाऱ्यांचे बळकटीकरण व्हावे, यासाठी सागरी सुरक्षा कवच (मॉक ड्रील) हे अभियान वर्षातून दोन ते तीन वेळा आयोजित करण्यात येते.

देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईपासून समुद्रमार्गे काही अंतरावर असणाऱ्या रायगड जिल्ह्याचे मुख्यालय असलेल्या अलिबाग तालुक्यातील मांडवा सागरी पोलिस स्टेशन हद्दीत सहाय्यक पोलीस निरीक्षक दिपक भोई यांनी वरिष्ठ अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली मॉक ड्रीलचे आयोजन केले होते.

मुंबईहून निघालेल्या प्रवासी बोटीत दोन दहशतवादी घुसल्याची खबर पोलीसांना मिळाली सागरी गस्तीकरता असणाऱ्या खांदेरी बोटीच्या अधिकारयांना माहिती देऊन बोटीचा पाठलाग करून बोट मांडवा जेट्टी येथे सुरक्षित घेऊन येण्याबाबत सूचना करण्यात आली. यावेळी बोट मांडवा जेट्टी येथे येताच तात्काळ मांडवा पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दीपक भोई आणि शस्त्रधारी सुरक्षा रक्षक यांच्यासहित बोटीत घुसून सदर दोन्ही अतिरेकी यांना यांना ताब्यात घेऊन त्यांना मांडवा पोलिस ठाण्यात नेण्यात आले. असे यशस्वी मॉकड्रील करण्यात आले.

त्याचवेळी मांडवा बोर्ड वॉक हॉटेल येथे एक आतंकवादी घुसून त्याने तेथील लोकांना ओलीस ठेवले आहे अशी माहिती मिळाली असता तात्काळ सहाय्यक पोलीस निरीक्षक



दीपक भोई व शस्त्रधारी कर्मचारी बोर्डवॉक हॉटेल येथे जाऊन तेथील किचनमध्ये लपलेल्या तिसरा संशयित डमी आतंकवाद्यास पकडून त्याला सुद्धा मांडवा पोलिस ठाण्यात नेण्यात आलेले आहे.व जखमी नागरिकांना रुग्णवाहिका द्वारे दवाखान्यात पुढील उपचारासाठी पाठवण्यात आले. यावेळी उपस्थितांना मॉकड्रिल बाबत पूर्ण माहिती देऊन अशा आपत्कालीन परिस्थितीत घ्यावयाची दक्षता व काळजीबाबत योग्य ते मार्गदर्शन केले

## घरांच्या शाकारणी कामांना सुरुवात

**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुक्यात सध्या ग्रामीण भागात घरांच्या शाकारणीच्या कामांना नागरिकांनी सुरूवात केल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

नेहमीच होणारा वातावरणीय बदल व मे पासून तर अनेकवेळा ढगाळवातावरण व अनेक ठिकाणी पडणारा पाऊस यामुळे नागरिकांनी आता घरांच्या शाकारणीच्या कामांना जोरात सुरूवात केली आहे.मजूरीने माणसेही मिळेनाशी झाली आहेत.मजूरकरांची मजूरीही वाढली आहे.

त्यातच लग्नसराई जोरात सुरू झाली आहे.याचा परिणाम अनेक नागरीक जसा वेळ मिळेल त्या पध्दतीने व त्या वेळेत घरांच्या शाकारणीची कामे लवकर उरकण्याचे प्रयत्न करत आहेत.कोठे कौले फुटतुट,तरकोठे कौलारू घरांच्या रिपा कुजल्याने,तर काही घरांचे पत्रे तुटल्याने त्या ठिकाणी नवीन कौले आणून टाकली जात आहेत.

मात्र ग्रामीण भागात आजही अधिक प्रमाणात कौलारू घरे असल्याने कौलांचाही तुटवडा पडत आहे.कौले बाजारात मिळताना कठिण होऊन बसतं आहे. आवकाळी पाऊस कधीही पडत असून नियमित ढगाळ वातावरण होतं असल्याने घरांची शाकारणी लवकर करण्याकडे नागरिक अधिक भर देत असल्याचे पहावयास मिळत आहे.





**पनवेल : रयत शिक्षण संस्थेचे रायगड विभागाचे विभागीय अधिकारी मोहन केशव कोंगेरे यांची आई हभप कै धनश्री कोंगेरे यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या घरी सांत्वनासाठी डोळखांब येथे भारतीय मजदुर महासंघाचे राष्ट्रीय महामंत्री सुरेश पाटील, डी.पी. सोनवणे, अरुण घाग, नुरा शेख उपस्थित होते.**

## पागोटे येथील सीडब्ल्यूसी गोदामाला भीषण आग

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील पागोटे येथील सिडकोच्या द्रोणागिरी नोड मधील गोदामाला काल रात्री भीषण आग लागली. सुदैवाने या आगीत कोणत्याही प्रकारची जीवित हानी झालेली नाही. तर सिडको आणि जेएनपीएच्या अग्निशमन दलाच्या जवानांनी ही आग आटोक्यात आणली.



जेएनपीए बंदरावर आधारित अनेक गोदाम उरण तालुक्यात आहेत. यातील पागोटे येथील सी डब्ल्यू सी उर्फ बजेट नावाच्या गोदामाला आग लागल्याची घटना घडलीआहे.

याची माहिती मिळताच सिडको आणि जेएनपीए मधील अग्निशमन दलाच्या वाहनांनी आणि जवानांनी शर्थीचे प्रयत्न करीत ही आग आटोक्यात आणली.

जेएनपीए बंदरातून आयात निर्यात करण्यात येणाऱ्या मालाची साठवणूक करणारे शंभर पेक्षा अधिक गोदाम तालुक्यातील विविध गावात आहेत. या गोदामात अतिज्वलनशील, रासायनिक पदार्थांची साठवणूक केली जात आहे. वाढत्या उन्हाच्या तडाख्यात येथील अनेक गोदमाना आगी लागण्याच्या घटना वारंवार घडत आहेत. ि

## अनधिकृत होर्डिंग हटवले; महाड पत्रकार संघाच्या मागणीला यश

**महाड: प्रतिनिधी**

छ. शिवाजी महाराज चौक झाला बॅनर मुक्त , महाड पत्रकार संघाच्या मागणीला यश आले असून सुशोभीकरण करण्यात आलेल्या महाराजांचा स्मारकाच्या सौंदर्यात भर.

सुमारे ७८ लाख रुपये खर्च करून महाड नगर परिषद प्रशासनाने शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात, छत्रपती शिवाजी महाराजांच्या अर्धाकृती पुतळयाचे सुशोभीकरण नुकतेच केले. मात्र याठिकाणी शेजारीच असलेल्या एका हॉर्डिंग वर अनाधिकृतरित्या बॅनर



लावण्यात येत असल्याने, सदरच्या सुशोभीकरणाचे विद्रुपीकरण झालेले आहे.

हे लक्षात घेऊन, महाड पत्रकार संघाने छत्रपती शिवाजी महाराजांच्या अर्धाकृती पुतळयाचे सुशोभीकरण झालेल्या परिसरात कोणत्याही प्रकारचे बॅनर लावण्यात येऊ नये, यासाठी सविस्तर निवेदन मुख्याधिकारी धनंजय कोळेकर यांना दिले होते.

त्यानुसार, महाड पत्रकार संघाच्या मागणीची दखल घेत प्रशासनाने होर्डिंग हटविण्याची कारवाई केली. या कारवाईमुळे छत्रपती शिवाजी महाराजांच्या अर्धाकृती पुतळयाच्या सौंदर्यीकरणात अधिक भर पडली आहे. या संपूर्ण कारवाई बाबत महाड पत्रकार संघ आणि महाड नगर परिषद प्रशासनाचे कौतुक होत आहे.

# लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलचे सुयश

## दहावी सीबीएसई परीक्षेत पहिल्याच वर्षी १०० टक्के निकाल

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सीबीएसई अर्थात केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेला इयत्ता दहावीच्या परीक्षेत रयत शिक्षण संस्थेच्या कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलचा निकाल पहिल्याच वर्षी १०० टक्के लागला आहे. या यशाबद्दल 'रयत'चे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अभिनंदन केले.



विद्यालयातून ३७ विद्यार्थी परीक्षेस बसले होते. सर्वच्या सर्व उत्तीर्ण झाले. त्यापैकी सात विद्यार्थ्यांना ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण प्राप्त झाले आहेत. १८ विद्यार्थी प्राविण्यासह प्रथम श्रेणीत, १० विद्यार्थी प्रथम व दोन विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत.

प्रणाली आनंदा देसाई या विद्यार्थिनीने ९५ टक्के गुण मिळवून विद्यालयात प्रथम क्रमांक पटकावला आहे. वेदांत बागल व जय झांजुर्णे यांनी ९४.६ टक्के गुण मिळवून संयुक्त द्वितीय, तर श्रावणी राजेश रिकामे हिने ९४.२ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक प्राप्त केला. साईअमृता घनतासला ९२.६ टक्के गुण मिळवून चौथी व सुमित संदीप घायाळकर ९१.६ टक्के गुण मिळवून पाचवा आला. सर्व विद्यार्थ्यांना प्राचार्य अविनाश कुलकर्णी, पर्यवेक्षिका रूहल दुबे आणि शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अभिनंदन करीत आनंद व्यक्त केला. या वेळी प्राचार्य अविनाश कुलकर्णी, स्वप्नाली म्हात्रे, पीआरओ बाळासाहेब कारंडे, हेड क्लर्क दत्ता कुटे उपस्थित होते. दरम्यान, विद्यालयाचे चेअरमन आमदार प्रशांत ठाकूर यांनीही अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

# 'सीकेटी'चा दहावीचा निकाल १०० टक्के

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे नवीन पनवेलमधील चांगु काना ठाकूर (सीकेटी) माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या मराठी माध्यमाच्या दहावीच्या विद्यार्थ्यांनी परीक्षेत शंभर टक्के निकाल लावून उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

या परीक्षेत एकूण १४२ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. त्यामध्ये ६६ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्यासह, ६३ विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणीत, १२ विद्यार्थ्यांनी द्वितीय श्रेणीत, तर १ विद्यार्थ्याने तृतीय श्रेणीत उत्तीर्ण होऊन विद्यालयाचा निकाल १०० टक्के लागवून शाळेची उज्ज्वल शैक्षणिक परंपरा कायम राखली आहे.

या यशामध्ये जान्हवी प्रकाश कुडेंकर हिने ९८.४० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. मानसी रविंद्र बड्डुजुर हिने ९५.४० टक्के गुण मिळवून द्वितीय क्रमांक मिळवला. तर नुपुर रमेश भगत व प्रज्ञा सुनिल खेडेकर यांनी अनुक्रमे ९४.६० टक्के गुणांसह तृतीय क्रमांक पटकावला.

या घवघवीत यशाबद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय.टी.देशमुख, सचिव डॉ. एस.टी.गडदे तसेच शाळेचे मुख्याध्यापक कैलास सत्रे, पर्यवेक्षक, सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांच्या पालकांचे अभिनंदन केले आहे.


जान्हवी प्रकाश कुडेंकर


मानसी रविंद्र बडगुजर


नुपूर रमेश भगत


प्रज्ञेश सुनिल खेडकर

# नवनियुक्त जिल्हाध्यक्ष अविनाश कोळींवर अभिनंदनाचा वर्षाव





















**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्षाच्या उत्तर रायगड जिल्हाध्यक्षपदी अविनाश कोळी यांची फेरनिवड करण्यात आली आहे. त्याबद्दल माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी पुष्पगुच्छ देऊन अविनाश कोळी यांचे अभिनंदन केले तसेच पुढील वाटचालीकरता सदीच्छा दिल्या.

भारतीय जनता पक्षाच्या वतीने महाराष्ट्र प्रदेशातील सर्व संघटनात्मक जिल्ह्यांकरिता जिल्हाध्यक्षांच्या नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या. या निवडींमध्ये अविनाश कोळी यांच्या कामाची दखल घेऊन त्यांना पुन्हा संधी देण्यात आली आहे. अविनाश कोळी यांनी यापूर्वीही आपल्या कार्यकाळात पक्षासाठी उल्लेखनीय कार्य केले आहे. त्यांच्या कार्यक्षम नेतृत्वामुळे रायगड जिल्ह्यात पक्षाची ताकद वाढली आहे. त्यांनी आपल्या कारकिर्दीत उत्तर रायगड जिल्ह्यात पक्षाची संघटनात्मक बांधणी मजबूत केली, विविध सामाजिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेतला, कार्यकर्त्यांमध्ये समन्वय साधून पक्षाचे कार्य पुढे नेले तसेच स्थानिक पातळीवर जनतेच्या समस्या सोडवण्यासाठी प्रयत्न केले. त्यामुळे त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांच्या खांद्यावर पुन्हा भाजपच्या उत्तर रायगड जिल्हा अध्यक्षपादी जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

अविनाश कोळी यांच्या निवडीनंतर कार्यकर्त्यांनी जल्लोष केला. अविनाश कोळी यांनी या निवडीबद्दल पक्षाचे आभार मानले आणि रायगड जिल्ह्यात पक्षाची ताकद अधिक वाढवण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. दरम्यान त्यांच्या निवड झाल्याबद्दल भाजपचे जिल्हा सरचिटणीस दीपक बेहरे, प्रकाश बिनेदार, चिटणीस ब्रिजेश पटेल, जिल्हा उपाध्यक्ष विठ्ठल मोरे, भाजपचे तालुका अध्यक्ष सनी यादव, राजेश भगत, पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, कळंबोली मंडळ अध्यक्ष अमर पाटील, माजी अध्यक्ष रविनाथ पाटील, जिल्हा चिटणीस संदीप म्हात्रे, ब्रिजेश पटेल, उपाध्यक्ष संदीप भगत, सुनील ढेबरे, प्रभाग अध्यक्ष प्रकाश शेलार, रामा महानावर, अशोक मोटे, महाराष्ट्र वाहतूक संघटनेचे अध्यक्ष प्रभूदास भोईर, उत्तर भारतीय मोर्चा जिल्हा महामंत्री राजेश पांडे, तालुका सरचिटणीस रवींद्र पाटील, महिला मोर्चा तालुकाध्यक्ष सुजाताताई दळवी, युवा मोर्चा विधानसभा संयोजक प्रसाद पाटील, वाहतुक सेल तालुकाध्यक्ष हरिभाऊ जाधव, विभाग अध्यक्ष भरत महाडिक, युवा मोर्चा सरचिटणीस विशाल लोते, उत्तर भारतीय अध्यक्ष केशव यादव, महिला मोर्चा अध्यक्षा राणी म्हात्रे, माजी नगरसेविका रूचिता लोंढे, अमित ओझे, केदार भगत, युवा मोर्चाचे चिन्मय समेळ, रूपेश नागवेकर, प्रितम म्हात्रे, अतुल बडगुजर, शमिता ठाकूर, सांगीता ठाकूर, युवा नेते जयेश पाटील, युवा मोर्चा कळंबोली अध्यक्ष गौरव नाईक, सरचिटणीस निशाण गिल, उपाध्यक्ष कृष्णा गर्जे, युवा मोर्चाचे प्रभाग ९ अध्यक्ष लड्डी सिद्धू, कळंबोली संपर्क प्रमुख रमेश मुंडे, शैलेंद्र त्रिपाठी, दै. रामप्रहरचे मुख्य संपादक देवदास मटाले, मल्हार चॅनलचे संपादक नितीन कोळी व कर्मचारीवृंद, पत्रकार संजय कदम यांच्यासह अनेक मान्यवरांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे अभिनंदन केले.









**पनवेल : भाजपचे पनवेल शहर उपाध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष संदीप पाटील यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी मयुर कदम, सचिन भोये, मोहित शर्मा, अमित देशमुख, प्रमोद म्हामुणकर, सुयोग पाटील आदी उपस्थित होते.**





**पनवेल : शहरातील गावदेवी पाडा येथे भोईर असोसिएट बिल्डर्स अ‍ॅण्ड डेव्हलपर्सच्या वतीने नवीन इमारत उभारण्यात येणार आहे. या कामाचे भूमिपूजन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते बुधवारी झाले. या वेळी त्यांनी महेश भोईर यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. माजी नगरसेविका दर्शना भोईर, केदार भगत, तुषार दुर्गे, मंगेश भोईर, उमेश इनामदार, राकेश टेमघरे, हरिश्चंद्र पाटील, सुरज महाडकर, मयुर भोपी, भुषण पोवळे, प्रवीण जाधव, प्रशांत शेडगे यांच्यासह भाताणकर कुटूंबीय उपस्थित होते.**



## संपादकीय

# महाराष्ट्राचे सुपुत्र!

देशाच्या आजवरच्या इतिहासात सरन्यायाधीश पदावर येणारे न्या. भूषण रामकृष्ण गवई हे दुसरे दलित व्यक्ती ठरले आहेत. बुधवारी भारताचे ५२वे सरन्यायाधीश म्हणून त्यांनी शपथ घेतली. त्यांच्या शपथविधी सोहळ्याला पंतप्रधान नरेंद्र मोदी उपस्थित होते. न्या. गवई यांचा कर्तव्यकठोर न्यायमूर्ती म्हणून परिचय आहे.

**न्या. भूषण रामकृष्ण गवई यांचा जन्म २४ नोव्हेंबर १९६० रोजी अमरावतीमध्ये झाला. अमरावतीच्या फ्रेजरपुरा येथील नगरपरिषदेच्या शाळेत त्यांचे प्राथमिक शिक्षण झाले. त्यांचे वडील रामकृष्ण सूर्यभान गवई हे आंबेडकरी चळवळीतील प्रमुख नेत्यांपैकी होते. ते दादासाहेब म्हणून ओळखले जायचे. त्यांनी अमरावतीचे खासदारपद व पुढे बिहार, सिक्किम आणि केरळचे राज्यपालपद भूषवले. आपल्या वडिलांचे वकिलीचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी भूषण गवई यांनी कायद्याच्या शिक्षणाची वाट निवडली. कालांतराने त्यांची मुंबई उच्च न्यायालयाचे अतिरिक्त न्यायमूर्ती म्हणून नियुक्ती झाली तेव्हा, एक दिवस तू देशाचा सरन्यायाधीश होशील असे दादासाहेबांनी म्हटल्याचे सांगितले जाते. आज न्या. भूषण गवई स्वतंत्र भारताच्या इतिहासातील सर्वोच्च न्यायालयाचे दुसरे दलित सरन्यायाधीश ठरले आहेत. यापूर्वी २००७ साली न्या. के.जी. बालकृष्णन सरन्यायाधीश झाले होते. त्यांच्यानंतर हा सन्मान न्या. गवई यांना मिळाला आहे. तसेच सरन्यायाधीश पदाचा सन्मान वाट्याला आलेले न्या. भूषण गवई हे नागपूरचे दुसरे न्यायमूर्ती ठरले आहेत. यापूर्वी नागपूरच्या न्या. शरद बोबडे यांनी सरन्यायाधीशपद भूषविले आहे. १९८५ मध्ये मुंबईत वकिलीची सुरूवात केल्यानंतर १९९० पर्यंत त्यांनी मुंबई उच्च न्यायालयात वकिली केली. त्यानंतर ते नागपुरला गेले. १४ नोव्हेंबर २००३ रोजी न्या. भूषण गवई यांची मुंबई उच्च न्यायालयाचे अतिरिक्त न्यायमूर्ती म्हणून नियुक्ती झाली. मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती म्हणून न्या. गवई यांनी सोळा वर्षे काम पाहिले. त्यांची ही कारकीर्द निर्भीड निकालांनी गाजली. पाय जमिनीवर असलेले न्यायमूर्ती असा त्यांचा लौकिक राहिला आहे. राजकीय कुटुंबातून आले असले तरी न्याय क्षेत्रात त्यांनी कधीही याचा परिणाम होऊ दिला नाही. सनसनाटीपणाला त्यांनी कधीही महत्त्व दिले नाही. तसेच सवंग लोकप्रियता कमावण्याच्या प्रयत्नातही ते कधीही दिसलेले नाहीत. अलीकडच्या काळात न्यायपालिकेवरील विश्वास कमी करणाऱ्या काही घटना घडल्या आहेत. या घटनांच्या पार्श्वभूमीवर न्या. गवई यांच्याकडे सरन्यायाधीशपद आले आहे. २०१६ मध्ये मोदी सरकारचा पाचशे आणि हजार रुपयांच्या नोटा रद्द करण्याचा नोटबंदीचा निर्णय न्या. गवई यांचा समावेश असलेल्या पाच न्यायमूर्तींच्या घटनापीठाने योग्य ठरविला होता. केंद्रसरकार आणि रिझर्व्ह बँकेने सहमतीने घेतल्याने हा निर्णय रास्त असल्याचे घटनापीठाने म्हटले होते. कलम ३७० रद्द करण्याच्या निर्णयाच्या वैधतेला मान्यता देणाऱ्या पाच न्यायाधीशांच्या घटनापीठातही न्या. गवई यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्यामुळे जम्मू आणि काश्मीरचा विशेष दर्जा रद्द झाला. सर्वोच्च न्यायालयाच्या सात न्यायमूर्तींच्या घटनापीठात समावेश असलेल्या न्या. गवई यांनी ओबीसींप्रमाणेच अनुसूचित जाती आणि जमातींनाही क्रिमी लेयर निकष लावला जावा, असे मत व्यक्त केले आहे. तिन्ही पालिकांनी परस्पर आदर बाळगावा, कार्यपालिकेचा अधिक्षेप न्यायपालिकेने करू नये अशी न्या. गवई यांची भूमिका आहे. सरन्यायाधीश म्हणून त्यांचा कार्यकाळ सुमारे सहा महिन्यांचा असेल. आपल्यापाशी वेळ कमी असल्याची जाणीवही त्यांना आहे.**

# केकला टरबूज (कलिंगड) एक उत्तम पर्याय





सध्याचे युग हे सिलेब्रेशनचे युग आहे. कुठलीही आनंदी घटना घडली की लगेच सर्वांचा एकाच सूर निघतो तो म्हणजे सिलिब्रेट करूया. पार्टी पाहिजे. मग तो वाढदिवस असो, परीक्षा पास झालेला असो, नौकरी लागलेली असो, साखरपुडा असो, पदोन्नती असो, लग्नाचा वाढदिवस असो की एखादे टार्गेट पूर्ण केल्याचा क्षण असो आणि हे सर्व क्षण हल्ली एकाच गोष्टी सोबत साजरे केले जातात तो म्हणजे केक.

केकची एव्हढी क्रेझ आहे की विचारू नका. काही झाले की केक कापा. बरं, केक कापा, केक खा इथपर्यंत ठीक आहे. त्यापुढे प्रकार असतो तो म्हणजे केक तोंडाला फासणे. त्याचे फोटो काढणे. हे सर्व भूषणावह वाटणे आणि समाज माध्यमांवर टाकणे. एकदा का हे फोटो समाज माध्यमांवर गेले की झाले सर्वचजण धन्य ! हे आपण का करतो ? कशासाठी करतो ? हे आपल्याला काही माहित नाही. सर्व करतात म्हणून आपण करतो. ह्याला कुठलाही आधार नाही. बरं हे सर्व लहानापासून तर मोठ्यापर्यंत सर्वच करतात. बरं हल्ली बऱ्याचजणांना साखर असते म्हणून ते केक खाऊ शकत नाही. जस्ट नावाला तुकडा तोंडाला लावतात खाल्लं की नाही खाल्या सारखं करतात कोणी तर कॅन्सरच्या भीतीने सुद्धा केक खात नाही. केक खाण्याचा सुद्धा पूर्ण आनंद घेऊन शकत नाही. ह्यात दुसरा प्रकार केक मध्ये क्रीम खूप आहे आम्ही खाणार नाही. तिसरा प्रकार केकमूळे वजन वाढत म्हणून खाणार नाही आणि चौथा टप्पा हा की केक मध्ये अंडे आहे म्हणून खाणार नाही. म्हणजे ह्या केकच्या सिलिब्रेशनला ह्या चार दिव्य परीक्षेतून जावं लागत. तरी एव्हढं फॅड आहे की सिलिब्रेशनसाठी केकचा पाहिजे. कशासाठी केकचा एवढा आग्रह ? असं काय एव्हढं आपलं घोड अडतंय ते ? सर्व करतात म्हणून आपण करतो. लॉजिक मात्र काहीच नाही. तर्क मात्र काहीच नाही. फक्त परंपरा पडली म्हणून आपण करतो आहे.

एक साधारणतः चार दशकापूर्वीचा काळ होता, त्या वेळेस मे महिन्यात लग्न समारंभ आयोजित केले जात असत. कारण हे असे की, १ मे नंतर सर्व शाळा, महाविद्यालयांना सुट्टी असे व ह्या शाळा, लग्न समारंभासाठी उपलब्ध असतं. त्यावेळेस सध्या सारखे हॉल उपलब्ध नव्हते व सध्या सारख्या सुख सोयी सुद्धा नसत व कुटुंबाची ऐपत सुद्धा नसे. सर्वजण सर्वसामान्यच असायचे. आता ह्या सर्व चार दशकापूर्वी झालेल्या लग्न सामोरोहचे मोठ्या प्रमाणात लग्नाचा वर्धापन (वाढदिवस) दिन साजरा केला जात आहे आणि हे सर्व लग्न वर्धापन दिन केक कापून साजरा केला जात आहे ह्यासाठी आठवण.

ह्या सिलिब्रेशन मध्ये असे आढळून येत आहे की, केक हा पदार्थ कोणी जास्त खात नसल्यामुळे त्याची नासाडी होत आहे व नाहक आर्थिक नुकसान होऊन समारोह साजरा केल्याचे समाधान शुद्ध मिळत नाही आहे.

आता गरज आहे ह्या केकला पर्याय शोधण्याचा भूतकाळात बघितले तर भारतीय संस्कृतीत कुठेही सिलिब्रेशनसाठी केक वापरल्याचे आढळत नाही. मग ह्याला पर्याय काय तर आपल्या नजरे समोर येतं ते म्हणजे टरबूज (कलिंगड). हे चवीसाठी गोड, सर्वांना स्वाद घेता येईल असे, दिसायला मोठे आणि खिशाला परवडेल असे आहे. ह्या फळाला बऱ्यापैकी पसंदी सुद्धा आहे आणि हल्ली हे बारमाही सुद्धा उपलब्ध आहे. तसेच हे सर्वत्र सुद्धा उपलब्ध आहे. आकाराने मोठे असल्यामुळे फोटो सुद्धा छान ठळक दिसतात व संपूर्ण कुटुंबाची गरज भागेल एव्हढे सुद्धा असते.

एक नजर टरबूज वर टाकूया की सिलेब्रेशसाठी हे कसे योग्य राहील. टरबूज उर्फ कलिंगड हे एक मोठे, हिरव्या रंगाचे, लाला पाणीदार गोड गर असणारे फळ आहे. ह्याचे शास्त्रीय नाव सिटरुलस लेनेटस असे आहे. साधारणतः हे फळ उन्हाळ्यात अधिक मिळतं आणि पसंद केल्या जातं. कलिंगड गुणाने अत्यंत शीत असून ते एक उत्तम टॉनिक सुद्धा आहे. हे खूप रुची देणारे आणि शरीरातील लघवीचे प्रमाण वाढविणारे फळ आहे. जर आपण ह्या फळाला पसंदी दिली तर फळाचे उत्पादन वाढून शेतकऱ्यांच्या समृद्धीसाठी मदत होऊन आपल्या देशाच्या उत्पादनाच्या वाढीला मदत होईल व देशाचे उत्पन्न पण वाढेल.

सुमारे ५००० वर्षांपूर्वी आफ्रिकेत पहिल्यांदा टरबूज पिकवण्यात आला यानंतर ते हळूहळू इजिप्त आणि ग्रीस मार्गे भारतात पोहोचले. इजिप्शियन पिरॅमिडमध्येही टरबुजाचे अवशेष सापडले आहेत. टरबूजमध्ये ९०% पेक्षा जास्त पाणी असते, जे शरीराला हायड्रेट करते म्हणूनच टरबुजाला उन्हाळी सुपरफूड असेही म्हणतात.

टरबूजमध्ये जीवनसत्वे आणि खनिजे भरपूर असतात. यामुळे हृदयाचे आरोग्य सुधारते, वजन नियंत्रणात राहते आणि पचनसंस्था देखील मजबूत होते. १०० ग्राम टरबूजमध्ये अंदाजे ३० कॅलरीज असतात. टरबूज हे जीवनसत्वे आणि खनिजांचा एक उत्कृष्ट स्रोत आहे. यामध्ये व्हिटॅमिन सी, व्हिटॅमिन ए आणि पोटॅशियम भरपूर प्रमाणात असते. टरबूज खाण्याचे अनेक आरोग्यदायक फायदे आहेत. उन्हाळ्यात ते शरीराचे तापमान सामान्य ठेवण्यास मदत करते. त्यामुळे रोगप्रतिकारक शक्ती वाढते आणि त्वचेचे आरोग्य देखील सुधारते. टरबूजमध्ये मुबलक प्रमाणात व्हिटॅमिन सी असते. यामुळे रोगप्रतिकारक शक्ती मजबूत होते. हे शरीराला संसर्ग आणि रोगांशी लढण्यास मदत करते आणि कर्क रोगासारख्या आजारांचा धोका देखील कमी करू शकते. व्हिटॅमिन ए आपल्या डोळ्यांसाठी खूप महत्वाचे आहे. म्हणून टरबूज खाल्याने डोळे निरोगी राहतात आणि दृष्टी कमकुवत होण्याचा धोका कमी होतो. टरबूजमध्ये जीवनसत्वे अ, ब ६ आणि क असतात. हे सर्व जीवनसत्वे त्वचा मऊ आणि चमकदार ठेवतात. टरबूज पचण्यास सोपे असते जे अन्न पचवण्यास मदत करतात म्हणून टरबूज खाल्याने पचनसंस्था मजबूत होते.

हे एव्हढे समृद्ध आणि गुणसंपन्न व आरोग्यवर्धक फळ असल्यावर त्याचा उपयोग आपल्या सिलेब्रेशन व स्वास्थासाठी करायला काही दुमत असायला नको. अगदी आपण त्याचा आनंदाने स्वीकार करायला पाहिजे व प्रत्येक सिलेब्रेशन टरबूज (कलिंगड) सोबतच करायला पाहिजे.

टरबूज हे सर्वानाच आवडतं. अगदी सामान्यांपासून तर सिलेब्रिटीज पर्यंत म्हणून तर काही चित्रपटामध्ये ह्याचे होरो हिरोईन सोबतचे सिन्स आढळतात. मग तो गजनी असो की दिल है की मानता नहीं असो ह्यात मोठ्या मनोरंजकपणे नट आणि नटीचे प्रेम व्यक्त करण्याचे सिन्स आढळतात.

टरबूज हे फळ सर्वांना हवे, हवे असणारे आहे म्हणून त्याला केकचा सर्वोत्तम पर्याय निवडून सिलेब्रेशनसाठी निवड करायला काय हरकत आहे ? हा बदल नक्कीच दिल है की मानता नहीं असे होईल पण आपल्या दिलाच्या स्वास्थासाठी आपल्याला आपल्या दिलाला राजी करावे लागेल आणि तो नक्कीच टरबुजासाठी राजी होईल. तरच आपले शरीर बुजासारखे १०० वर्षे उभे राहील.

**–अरविंद सं. मोरे,** नवीन पनवेल



## बदलते तंत्रज्ञान

# वाय-फाय राउटरने शरीरात काय बदल होतो



हैदराबादमधील लकडी का पूल येथील ग्लेनेगल्स हॉस्पिटलमधील कन्सल्टंट फिजिशियन, डायबेटोलॉजिस्ट आणि क्रिटिकल केअर स्पेशालिस्ट डॉक्टर हिरन एस. रेड्डी म्हणाले की, एका आठवड्यासाठी रात्री वायफाय राउटर बंद केल्याने व्यक्तींमध्ये शारीरिक बदल होण्याची शक्यता फारच कमी आहे.

वायफाय उपकरणे लो लेव्हल, नॉन–आयोनायझिंग रेडिएशन उत्सर्जित करतात, जे वैज्ञानिक एकमतानुसार दररोजच्या संपर्कासाठी सुरक्षित आहेत. पण, ज्या लोकांना इलेक्ट्रोमॅग्नेटिक फील्ड्स (EMFs) बद्दल संवेदनशीलता असल्याचे आढळले आहे त्यांच्यासाठी, हा बदल डोकेदुखी, झोपेचा त्रास किंवा मानसिक थकवा यासारख्या लक्षणांपासून आराम देऊ शकतो. असे असले तरीही इलेक्ट्रोमॅग्नेटिक अतिसंवेदनशीलतेचे समर्थन करणारे क्लिनिकल पुरावे अनिर्णित आहेत, असे डॉक्टर हिरन एस. रेड्डी म्हणाले आहेत.

डॉक्टर सुधीर कुमार यांच्या मते, वाय–फाय राउटर २.४ GHz किंवा ५ GHz फ्रिक्वेन्सी बँडमध्ये नॉन–आयोनायझिंग रेडिएशन उत्सर्जित करतात; जे खूप कमी–ऊर्जेचे ईएमएफ आहेत आणि जे मोबाईल फोन डोक्याजवळ धरल्यावर उत्सर्जित होणाऱ्या किरणांपेक्षा खूपच कमी आहेत. घरामध्ये १ ते २ मीटर किंवा त्यापेक्षा जास्त अंतरावर असताना या EMFsची तीव्रता झपाट्याने कमी होते. त्यामुळे एक सामान्य वायफाय राउटर मेलाटोनिन या झोपेस मदत करणाऱ्या संप्रेरकाच्या निर्मितीवर परिणाम करतो किंवा पीनियल ग्रंथीचं (pineal gland) काम बिघडवतो, ही शक्यता खूपच कमी आहे. दुसरीकडे, ब्लू लाईट पाइनल ग्रंथीच्या कार्यात व्यत्यय आणून झोपेच्या गुणवत्तेवर आणि प्रमाणावर प्रतिकूल परिणाम करतो

याव्यतिरिक्त, रात्रीच्या वेळी डिजिटल एंगेजमेंट कमी केल्याने मेलाटोनिनचे उत्पादन चांगले होऊ शकते, जे झोपण्याच्या आणि उठण्याच्या चक्राचे नियमन करण्यासाठी जबाबदार आहेत तसेच रात्री वायफाय बंद करण्याचा झोपेच्या गुणवत्तेवर अप्रत्यक्षपणे फायदे होतो. म्हणजेच वायफायचा वापर दीर्घकाळ स्क्रीन एक्सपोजरशी संबंधित असतो. त्यामुळे वायफाय बंद केल्याने रात्रीचा स्क्रीन वापर मर्यादित होऊ शकतो, शांत झोप लागण्यास मदत होऊ शकते.

# संत जनाबाई

परभणी जिल्ह्यातील गंगाखेड गावात इ.स.१२६५मध्ये संत जनाबाईंचा जन्म झाला होता. त्यांच्या आईचे नाव दमाबाई आणि वडिलांचे नाव करुंड होते. त्यांचे वडील पेशाने वैद्य असल्याचे कळते. त्यांच्या आई–वडिलांचे लवकरच निधन झाल्याने जनाबाई सहा वर्षाच्या असताना गावातील लोकांनी त्यांना पंढरपूरच्या वाळवंटात आणून सोडले असे सांगितले जाते. हे बाळ तेथे रडत असताना दामाशेटी यांनी त्यांना पाहिले व ते तिला स्वतःच्या घरी घेऊन गेले. जनाबाईंचा शेवटपर्यंत चांगल्या पद्धतीने दामाशेटी यांनी सांभाळ केला. ते संत नामदेव महाराजांचे वडील होते.

शेकडो वर्ष महाराष्ट्राच्या मुखात दोन संतांचे अभंग ऐकावयास मिळतात ते दोन संत म्हणजे संत तुकाराम महाराज आणि संत जनाबाई. सावळी विठाई म्हणजे दीनदुबळ्यांची आई. सुखदुःख जाणून घेणारी माऊली.असे अनेक अभंगातून विठ्ठलाचे आणि रखुमाईचे गोड वर्णन या अनाथ संत जनाबाईने केलेले आहे.

विठ्ठलाच्या मंदिरासमोरच झोपडीत राहणाऱ्या जनाबाईवर ज्यावेळेस विठ्ठलाचे सोने–नाणे चोरल्याचा आरोप होतो. त्यावेळेस ती म्हणते मी सोन्यानाण्याची नव्हे तर विठ्ठलाची चोरी केली आहे. आणि



## निमित्त

त्याला माझ्या हृदयात बंदिस्त करून ठेवले आहे. अशी ती धरीला पंढरीचा चोर या अभंगातून सांगते. माझे अचडे बचडे छगुले ग राधे रुपडे अशा अभंगामधून विठ्ठलाच्या बाळ रूपाचे वात्सल्याचे अभंग तर तिचे अप्रतिम ठरलेले आहेतच . विठू माझा लेकुरवाळा । संगे गोपाळांचा मेळा । हा अभंग संत जनाबाईंनी लिहिलेला आहे . ज्ञानेश्वरांविषयी त्या म्हणतात परलोकीचे तारूश्र म्हणे माझा ज्ञानेश्वरु संत जनाबाईंचे अभंग दूरपर्यंत लोकप्रिय झाले आणि तिची ख्याती कबीरांच्या कानी गेली. इतके सुंदर अभंग रचणारी ही स्त्रीआहे तरी कोण या उत्सुकतेपोटी संत कबीर जनाबाईच्या भेटीसाठी पंढरपुरास आले. पंढरपुरास आल्यानंतर त्यांना कळाले की ती संत नामदेवांच्या घरी कामाला आहे. संत नामदेवांच्या घरी गेल्यानंतर त्यांना कळाले की जनाबाई गोपाळपुरास गवऱ्या थापायला गेली आहे. तिला परत घरी येण्यासाठी काही वेळ लागेल.दुसऱ्याच्या घरी असे काम करणारी बाई असे अभंग लिहिते याचे त्यांना विशेष वाटले.आजही जनाबाईंच्या ओव्या लोकांना अतिशय प्रिय आहेत. खेड्यापाड्यांमध्ये जणाबाईंच्या ओव्या आजही आनंदाने गायल्या जातात. विशेष करून कोकणामध्ये जनाबाईंच्या ओव्या फारच प्रसिद्ध आहेत. जनाबाईंची काकड आरतीही फार प्रसिद्ध आहे. तसेच संत जनाबाईंचे अनेक अभंग नामदेव गाथेमध्ये आढळतात. कृष्णजन्म, प्रल्हाद चरित्र, बाल क्रीडा या विषयावर तिचे अभंग आहेत.

संत नामदेव हेच त्यांचे परमार्थिक गुरु समजले जातात. संत ज्ञानदेव –विसोबा खेचर– संत नामदेव– संत जनाबाई , अशी ही गुरु शिष्यांची परंपरा चालत आलेली आहे.संत ज्ञानदेव महाराजांच्या काळातील सर्व संतांना त्यांनी प्रत्यक्ष पाहिलेले आहे. संत जनाबाई आषाढ कृष्ण त्रयोदशीला शके १२७२ इ.स.१३५० मध्ये समाधीस्थ होऊन पांडुरंगामध्ये विलीन झाल्या.शेवटी जनाबाई नामदेव पायरीच्या चिरासोबतच अंतराधीन पावल्या... (साभार– इंटरनेट)


## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

# चांदीच्या भांड्यातील पाणी आरोग्यासाठी फायदेशीर

डिटॉक्स आणि तांब्याच्या भांड्यानंतर आता चांदीच्याभांड्यातील पाणी पिण्याच्या ट्रेंडने सध्या सोशल मीडियावर सर्वांचे लक्ष वेधले आहे, काही पोस्टमध्ये असे सूचित केले आहे की,शुद्ध चांदीने भरलेले पाणी पिण्याचे अनेक आरोग्य फायदे आहेत. उदाहरणार्थ, तेजल पारेख ज्या प्रमाणित फिटनेस प्रशिक्षक त्यांनी इंस्टाग्राम पोस्टमध्ये असा दावा केला की, एखाद्याने पाण्याच्या भांड्यात चांदीचे नाणे घालून ते प्यावे. चांदीमध्ये नैसर्गिक अँटीमायक्रोबियल गुणधर्म आहेत जे पाणी ताजे आणि हानिकारक बॅक्टेरियापासून मुक्त ठेवतात. ते विशेषतः मुलांसाठी उत्तम आहे, त्यांची प्रतिकारशक्ती वाढवते आणि त्यांना दररोज शुद्ध, स्वच्छ पाणी पिण्याची खात्री देते. ते आतड्यांच्या आरोग्याला प्रोत्साहन देते, पाण्यामुळे होणाऱ्या आजारांशी लढते, पचनसंस्थेला शांत करते, त्वचेसाठी फायदेशीर आहे आणि पेशींचे आरोग्य देखील वाढवते, असे पारेख यांनी इंस्टाग्रामवर म्हटले आहे.



चांदी प्रौढांसाठी आतड्यांचे आरोग्य सुधारते. शरीरातील विषारी पदार्थ काढून टाकणे आणि एकूणच आरोग्याला फायदे देते. चांदीमध्ये थंडावा देणारे गुणधर्म आहेत जे अतिरिक्त उष्णता संतुलित करण्यास मदत करू शकतात. ते शांततेची भावना निर्माण करते आणि ताण कमी करते, जे अप्रत्यक्षपणे मानसिक स्पष्टता आणि स्थिरतेला समर्थन देते! काही परंपरांमध्ये असे मानले जाते की,चांदीचा शरीरावर ऊर्जा–संतुलन प्रभाव पडतो, जो चैतन्य वाढवतो आणि मानसिक आणि शारीरिक ऊर्जा वाढवतो. शुद्ध पाण्याचे सतत सेवन केल्याने पेशींच्या आरोग्यास मदत होते, ज्यामुळे दीर्घकालीन आरोग्य मिळू शकते,

चांदीच्या भांड्यातील पाणी पिण्याबाबत त्यांनी सावधगिरी बाळगण्याचा इशारा दिला :

शुद्ध चांदी वापरा: चांदीचे नाणे ९९ टक्के शुद्ध चांदीचे आहे याची खात्री करा, त्यात अशुद्धता किंवा चांदीचे कोटिंग नाही.

नियमित स्वच्छता: नाणे खराब होऊ नये यासाठी लिंबू आणि बेकिंग सोडा सारख्या नैसर्गिक क्लींजरने दर आठवड्याला नाणे स्वच्छ करा. बेस वॉटर आधीच स्वच्छ आहे याची खात्री करा .चांदी हा योग्य गाळण्यासाठी योग्य पर्याय नाही.

# अवकाळी पावसामुळे रानमेवा बेचव; आदिवासींचा उदरनिर्वाह संकटात!

**खोपोली : प्रतिनिधी**



खालापूर तालुक्यातील बहूसंख्य आदिवासी ठाकूर समाज बांधव आपल्या उदरनिर्वाह करण्याकरिता मोलमजुरी किंवा डोंगर माथ्याला जाऊन रानमेव्यातील करवदे, जांभुळ, आंबे या झाडांची फळे विकून येणाऱ्या पिकातुन आपला उदरनिर्वाह करित असतात. परंतु यावर्षी ६ मे रोजी पासून सुरू झालेल्या अवकाळी पावसाने खालापूर तालुक्यात धुमाकूळ घातल्याने रानमेव्याला पावसाची झळ लागल्याने रानमेवा बेचव झाला आहे.

शिवाय सोसाट्याच्या वारा आणी पाउस यामुळे फळ झाडाल लागलेली फळे त्या पासून अलग झाल्यामुळे ती खराब होत चालली आहेत. यामुळे ग्राहकांनी रानमेवाकडे पाठ फिरवल्याने आदिवासी व ठाकूर समाज बांधवापुढे मोठे संकट निर्माण झाले असता त्याच्या कुटुंबाचा उदरनिर्वाहाचा प्रश्न त्यांच्या समोर उभा राहिला आहे.

आदिवासी व ठाकूर समाज बांधव बाजारात किंवा गावोगावी फिरुन तसेच रस्त्यालगत एखाद्या झाडाचा आसरा घेत आदिवासी बांधव करवंदे, आंबे, जांभुळ व घेऊन त्यांची विक्री करुन आपला दैनंदिन उदरनिर्वाह करीत असून बहुतांश आदिवासी, ठाकूर बांधवांच्या कुटुंबांची उदार निर्वाह रानमेव्याच्या उत्पन्नातून होत असते, मात्र अवकाळी पावसाच्या आगमनाने आंबा, जांभुळ, करवंदे रोग पडला असल्याने या रानमेव्याची चव बेचव झाल्याने ग्राहकांनी त्याच्या मालाकडे पाठ फिरवली असुन त्यांच्या मालाची विक्री होत नसल्याने आदिवासी बांधवाच्या दैनंदिन जीवनात मोठा परिणाम होत असल्याने दिसून येत आहे.

# सर्व्हेक्षण समितीची कर्जत एसटी आगाराला भेट

**कर्जत : प्रतिनिधी**




हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ, सुंदर बस स्थानक अभियानांतर्गत सर्व्हेक्षण समितीने काल सायंकाळच्या सुमारास अचानक कर्जत एस टी आगाराला भेट दिली व तब्बल दोन तास सर्व परिसराची पाहणी केली तसेच कार्यालयीन कागदपत्रांची तपासणी केली. समितीने कर्जत आगाराच्या कारभाराबद्दल समाधान व्यक्त करून अधिक चांगले आगार होण्यासाठी महत्वाच्या सूचना केल्या.

दुपारी दीडच्या सुमारास ठाणे जिल्ह्याचे विभागीय वाहतुक अधिक्षक रमेश बांदल यांच्या अध्यक्षतेखालील सर्व्हेक्षण समिती कर्जत एस टी आगारामध्ये आली. विभागीय कर्मचारी वर्ग अधिकारी कृष्णा बन, कोंकण एस टी प्रेमी ग्रुप सदस्य परहान होडेकर, पत्रकार विजय मांडे यांचा या समितीमध्ये समावेश होता. प्रभारी आगार व्यवस्थापक दयानंद मोरे यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

त्यानंतर सहाय्यक वाहतुक निरिक्षक महादेव पालवे, वाहतुक नियंत्रक दीपक देशमुख यांच्या समवेत संपूर्ण आगार परिसराची पाहणी केली. यावेळी त्यांनी स्वच्छता गृहाच्या स्वच्छतेबाबत चांगला अभिप्राय दिला तसेच संपूर्ण आगार परिसरातील स्वच्छता, प्रवासी निवारा, सी एन जी पंपाची व्यवस्था, कार्यालयातील कामामध्ये वेगळ्या प्रकारच्या मांडणी बद्दल समाधान व्यक्त केले.

आगार व्यवस्थापकांचे निवास स्थान तसेच इमारतींची दुरुस्ती याबाबत सूचना केल्या. कमी मनुष्यबळ असूनही आगार चांगल्या प्रकारे चालू आहे. याबाबत समिती सदस्यांनी प्रशंसोदगार काढले. समिती अध्यक्ष रमेश बांदल यांनी ' प्रवासी वाढविण्यासाठी प्रयत्न करावेत. परिसरात एखादे उद्यान विकसित करावे. प्रवासी व कर्मचाऱ्यांसाठी आरोग्य शिबिरांचे आयोजन करावे.' अशा सूचना केल्या. मोरे यांनी, ' आगारासाठी नवीन एस टी गाड्या आल्या नाहीत. सुरुवातीला पाच नवीन एस टी बस आल्या तरी प्रवाशांना चांगल्या सुविधा देण्यात येतील.' असे सूचित केले. मांडे यांनी, 'हे आगार १९८० च्या दरम्यान सुरु झाले. आगारासाठी भरपूर जागा आहे मात्र बहुतांश इमारती नादुरुस्त आहेत. निधी उपलब्ध झाल्यास आगाराचे रूप बदलले जाईल. त्यासाठी आमदार महेंद्र थोरवे यांच्याकडे मागणी करण्याची आवश्यकता आहे.' असे सूचित केले.

# मोटरसायकल अपघातात तरुण ठार, दुसरा जखमी

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील चोळई येथील दोन तरुण मोटरसायकलने महाबळेश्वर रस्त्यावरील कापडे बुद्रुक भागातून येत असताना झालेल्या अपघातात एकाचा मृत्यू झाला तर दुसरा गंभीर जखमी झाला आहे. हा अपघात मंगळवारी दुपारनंतर झाला आहे.

कापडे बुद्रुक हद्दीतील हॉटेल श्रद्धा समोरील रस्त्यावर अचानक पोलादपूर बाजूकडून एक वाहन आल्याने मोटरसायकलवरील राज विनोद कदम (१७ वर्षे) याने मोटरसायकल वरून उडी मारली. यामुळे मोटारसायकल स्वार आदित्य सतीश पवार याचा वाहनावरील ताबा सुटला आणि मोटारसायकल साईड पट्टीच्या दिशेने गेली. यावेळी राज विनोद कदम याच्या जागीच मृत्यू झाला तर मोटार सायकलस्वार आदित्य पवार हा गंभीर जखमी झाला.

अपघाताच्या घटने नंतर आमची माती आमची माणसं सामाजिक संस्थे तर्फे तालुक्यातील मोटार सायकलस्वार तरुणांसाठी शंभर हेल्मेट वाटप करणार असल्याचे जाहीर करण्यात आले आहे.

## जाहीर नोटीस

सर्व संबंधीतास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिलांनी खालील वर्णनाची मिळकत बोजावीरहीत तीचे मालक मे. आर.एस.एम. रिअल्टर्स भागीदारी संस्था, पत्ता -७०५, सातवा माळा, सत्रा प्लाझा, पाम बिच रोड, सेक्टर १९, वाशी, नवी मुंबई- ४००७०३, यांचेकडून कायमची विकत घेण्याचे ठरविलेले आहे. त्याबाबतचा आवश्यक तो व्यवहार माझे अशिलांनी सदरहु मालकांबरोबर ठरविलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

मौजे - दहिवली तर्फे नीड, तालुका कर्जत, जिल्हा रायगड, महाराष्ट्र येथील कर्जत नगरपालिका हद्दीतील, गट क. १०२, १४० व १४१ यांच्या अकृषीक लेआऊट मधील खालील जमीन मिळकत

| लेआऊट प्लॉट क्र. | क्षेत्र चौ. मी. |
|---|---|
| २ | ८४० चौ.मी. |
| ३ | ४९० चौ.मी. |

या सदरहु मिळकतीशी अथवा तिच्या कोणत्याही भागाबाबत कोणाचाही दान, गहाण, बक्षिस, फरोक्त, कुळ, वहीवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिदध् झाल्यापासून ७ दिवसांचे आत खाली नमूद केलेल्या पत्यावर कागदोपत्री पुराव्यासह आपल्या हरकती नोंदवाव्यात. वरील मुदतीत कोणाच्याही हरकती न आल्यास सदरहु मिळकत निर्वेध, निर्देश व बोजारहीत असल्याचे गृहीत धरून व कोणत्याही इसमाचे हक्क असल्यास ते सोडून दिले आहेत असे समजले जाईल आणि आमचे अशिल विक्रिचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणा-या हरकतींचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**नवी मुंबई**
**दि. १४/०५/२०२५**

**सही/-**
**ॲड. नवीन वि. धोंगडी**
**पत्रव्यवहाराचा पत्ता- फ्लॅट नंबर डी-४०१, ग्रिनस्केप रॉयल, प्लॉट क्र.२५, सेक्टर ७, कामोठे, ता. पनवेल, जि. रायगड-४१०२०९**
**मो. क. ९००४०८७८७३**

# फणसाड अभयारण्यात बिबटे, रानगव्यांची संख्या वाढली

**मुरुड : प्रतिनिधी**



मुरुड तालुक्यातील सुपेगाव येथील सुमारे ५४ कि.मी.क्षेत्र परिसरात फणसाड अभयारण्य क्षेत्राचा विस्तार झालेला असुन या अभयारण्याचे वनपरिक्षेत्र अधिकारी-नितिन ढगे यांच्या मार्गदर्शनाखाली १२ मे या दिवशी बौध्द पौर्णिमेचे औचित्य साधून पक्षी -प्राण्यांची गणना करण्यात आली.

यावेळी वनपरिक्षेत्र अधिकारी-नितिन ढगे, वनपाल- आदेश पोकळ,किरण मोरे ,अरुण पाटील,संतोष पिंगळा, सुनील जाधव, केरबा खांडेकर,प्रदिप शेळके,गोरक्ष भांबरे, शशिकांत आरोटे, अभिजित पाटील, सुर्यकांत कुरभिले, पक्षी प्रेमी संदिप घरत, वनमजूर- सदानंद नाईक,प्रदिप बागवे,योगेश ढोकरे,केतन वने,किशोर धनवडे,दिपक पतेने तसेच मुंबई ,पुणे व अलिबाग येथील आलेले पर्यटक- अमित टिळेकर, निनाद अरुंडेकर, गीता परदेशी, अविनाश आगाशे, आरीन देव, रशिका बडवे, संजय सपकाळ, अजय सपकाळ, शुभम सपकाळ आदिंसह या जणगणाना करण्यासाठी उपस्थित होते.

या अभयारण्यात १९ प्रकारचे वन्यप्राणी आढळतात यामध्ये बिबट्या ,सांबर ,भेकरे ,डुक्कर ,षेकरु ,पिसोरी ,ससा ,कालामांजर ,रानमांजर ,जवादा ,सालिंदर ,मुंगा ,वानर ,मोर ,रान कुत्रा,गवा,गिधाड , आदि प्राण्यांचे वास्तव्य आहे. तसेच १९० प्रकारचे रंगी-बेरंगी पक्षी ,१३० प्रकारची फुलपाखरे या मध्ये ब्लु मॉरमॉन ,मॅप , व आदि फुलपाखरु आढळुन येतात.या जणगणाना मध्ये प्राणी- सांबर,रान डुक्कर,बिबट्या, रानगवे रानमांजर इत्यादी.,पक्षी- बगळे,घुबड, वटवाघूळ,मोर,रान कोंबडा,रानरातवा, पाणकावळा,ती बोटी खंड्या, नवरंग लहान निळा खंड्या, हरियाल,राखी कोतवाल, मलबार धनेश, शामा, बेडुक तोंड्या, ,रानपिंगळा,सातभाई,दयाल , स्वर्गीय नर्तक निळा माशीमार हळद्या सुतार पक्षी इत्यादी.,

सरपटणारे प्राणी - हिरवा चापडा,धिवड इत्यादी.,रानरातवा पक्षाची तीन ठिकाणी अंडी, उभयचर -बेडुक यांची नोंद फणसाड अभयारण्यातील वनविभागाचे कर्मचारी पक्षी प्रेमी व पर्यटकांनी केली. या अभयारण्याचा विस्तार खूप मोठा असल्याने रानगवे हे काही ठिकाणी कळप करून राहत असल्याने पाणी पिण्याच्या ठिकाणी जरी आले नसले तरी त्यांचे वास्तव्य आजुबाजूच्या परिसरात दिसून आले आहे. बिबट्याची संख्या वाढली असून येथे त्यांच्या पाऊल खुणा स्पष्टपणे दिसून आलेल्या आहेत.बिबट्याला मुबलक शिकार उपलब्ध होत असल्याने जंगलाच्या गडद भागात त्याचे वास्तव्य दिसून आले आहे.

या संदर्भात वनपरिक्षेत्र अधिकारी - नितिन ढगे यांनी सांगितले की स्थानिक नागरिकांसह पर्यटकांना निसर्गाचा अनुभव घेता यावा हाच मुख्य उद्दिष्ट पक्षी प्राण्यांची गणानेचा आहे. दरवर्षी प्रमाणे यंदा ही बौद्ध पौर्णिमेला पक्षी प्राण्यांची गणना मोजक्याच ठिकाणी वन्य प्राण्याला न त्रास देता जंगलातील १५ टक्के परिसरात लोकांमार्फत केलेली गणाना आहे.या गणाना करिता १३ ठिकाणी लाकडी मचान बांधण्यात आले होते.या मचान वरुन दुर्बीणव्दारे पक्षी प्राण्यांची गणना करण्यात आली यामध्ये सांबर, डुक्कराची छोटी पिल्ले पाणी पिण्यासाठी आलेली दिसुन आली.तसेच बिबट्या नी केलेली रान डुक्कराची शिकाराचे अंश दिसण्यात आले. तसेच वेगवेगळ्या पक्षीची नोंद करण्यात आली आहे.


# माणगावात नेत्र तपासणी शिबिरास प्रतिसाद

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगावात शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल व उद्योजक विजयशेठ मेथा चॅरिटेबल ट्रस्ट माणगावतर्फे बुधवार दि.१४ मेरोजी मोफत नेत्र शिबीर आयोजीत करण्यात आले होते . या शिबिरात शंकरा आय हॉस्पिटलचे नेत्ररोगतज्ज्ञ डॉ.प्रकाश पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी नवीन २८ रुग्णांची तपासणी करून ४ नेत्ररुग्णांना पनवेल येथे नेऊन त्यांच्यावर मोफत यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली आहे.

माणगावात गेली दोन वर्षांहुन अधिक काळापासून ३५ वेळा शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल व माणगाव येथील प्रसिद्ध उद्योजक विजयशेठ मेथा चॅरिटेबल ट्रस्ट यांच्यातर्फे मोफत नेत्ररोग व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात आतापर्यंत २७३२ हुन अधिक नेत्ररुग्णांवर यशस्वी मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आलेले आहेत.

सदर शिबीर यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी विजयशेठ मेथा, सुप्रिया शिंदे, तनुजा मेथा, छाया मेथा, विधिता मेथा, मनीष मेथा यांच्यासह शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेलचे टीम व्यवस्थापक प्रकाश पाटील, डॉ.अश्विनी राऊत,ओमकार पाटील,अर्पिता जाधव,रुचिका जंगम,रामदास पवार यांनी सहकार्य करीत विशेष परिश्रम घेतले. सदर शिबीर हे दर महिन्यातील एका बुधवारी आयोजित करण्यात येत असल्याने या शिबिराचा लाभ बहुजन समाजातील गरीब गरजू नेत्र रुग्णांनी अवश्य घ्यावा असे आवाहन मेथा परिवारातर्फे सामाजिक कार्यकर्ते तथा प्रसिद्ध उद्योजक विजयशेठ मेथा व सहकारी यांनी केले आहे.



## पनवेल महानगरपालिका
**ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६**

### जाहीर नोटीस सूचना

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन उक्त अधिनियम कलम ८(३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | बाधित झाडांची संख्या | झाडे तोडण्याचे कारण व ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | M/s.Haware Engineers & Builders Pvt.Ltd..416. Vardhman Market, ector-21. Vashi, Navi Mumbai-400 705. | ०१ गुलमोहर झाड तोडणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील Plot No.-14, Sector-16E, At.-Kalamboli, Tal.-Panvel, Dist.-Raigad येथे ०१ गुलमोहर झाड नवीन इमारतीत प्रवेशव्दारासमोर असुन, अग्निशमन वाहन. रुग्णवाहिका व इतर वाहने ये-जा करणेस अडथळा होत आहे. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात योग्य त्या कागदपत्रांसह पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागामध्ये सादर करावेत. मूदतीत हरकती न आल्यास सदरची झाडे तोडणेस वरील अधिनियमानुसार सशर्त परवानगी देणेबाबत पुढील कार्यवाही करण्यास येईल, याची नोंद घ्यावी.

**दिनांक :- १५/०५/२०२५**

**सही/-**
**उपायुक्त**
**(वृक्ष प्राधिकरण विभाग)**
**पनवेल महानगरपालिका**

PMC-PARK/224/-PTAD

## NOTICE INVITING TENDER

**Shri Leuva Patidar Kanya Kelvani Mandal**

C/O Ruchi Ceramic, Near Heera Manek Compound, Jagruti Nagar, Ghatkopar West, Mumbai -400086

**Notice Inviting Tender**

Sealed Tenders are invited Under Two bid System Wide Tender No. SLPKKM/25-26/01

| Name of Work | Tender Fee | EMD | Estimate | Last Date Tender Purchase | Last Date Tender Submission | Tender Openning Date |
|---|---|---|---|---|---|---|
| Electrical Works of Educational Building at Village Nadhal ,Tal – Khalapur, Dist. Raigad | Rs.500 | Rs. 75,000 | Rs. 40 Lacs | 10-05-2025 | 19-05-2025 | 20-05-2025 |

Tender Documents i.e. Tender form and other terms and conditions are part of Tender document which can be purchased from office Contact - Mr. Lalji Bhabhiniya -9324669162, Address - As mentioned Above. Time -10 A.M. to 5.30 P.M.on working days

## Panvel Municipal Corporation, Panvel

### TENDER NOTICE

**Tender Notice No.: MHD/01/2025-26 (2nd Call)**

Online bids are invited from bidders for purchase of the following items on behalf of the Commissioner, Panvel Municipal Corporation, Panvel (here in after called the CORPORATION) and will be received online on the website www.mahatenders.gov.in as per time schedule (key dates) in the notice published on the above website. Tenders are being invited online from eligible contractors for "Supply and Installation of 04 Portable Handed Digital X-Ray Machine with Software of Tuberculosis Detection (Chest AI) for the citizen of Panvel Municipal Corporation Area".

| Sr. No. | Name of Work | Earnest Money Deposit (Rs.) | Cost of tender form (Rs.) | Period of work |
|---|---|---|---|---|
| 1 | Supply and Installation of 04 Portable Handed Digital X-Ray Machine with Software of Tuberculosis Detection (Chest AI) for the citizen of Panvel Municipal Corporation Area. | 1,25,000/- | 12,000 + GST | THREE MONTHS |

**Key Dates -**

| Sr. No. | Description | Date | Time |
|---|---|---|---|
| 1 | Publish Date | 14/05/2025 | 12:00 |
| 2 | Document Download Start Date | 14/05/2025 | 12:00 |
| 3 | Document Download End Date | 21/05/2025 | 15:00 |
| 4 | Bid Submission Start Date | 14 /05/2025 | 12:00 |
| 5 | Bid Submission End Date | 21/05/2025 | 15:00 |
| 6 | Bid Opening Date | 22/05/2025 | 11:00 |

Signature of Tenderer — Medical Officer of Health

**Note** The bidders shall have to submit their bids online and upload the documents as per key schedule (key dates).

1. Tender documents can be purchased online from www.mahatenders.gov.in by making online payment as specified above as per key dates. The bidders shall have to submit their Bids online and uploads the relevant documents from as per time schedule.
2. The form fee and earnest money deposit will be accepted online.
3. Conditional tenders will not be accepted and liable to be rejected.
4. The Particular of tender procedure will be available on website https://mahatenders.gov.in In case of any problem please contact helpline no.022-27458040/41 42, 0120-4001002, 0120-4001005, 0120-6277787 (Morning 10:00 Hrs to Evening 18:00 Hrs).
5. The Commissioner reserves the right to accept or reject any or all tenders without assigning any reason thereof.

जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२५/प्र.क्र.२०४/२०७/२०२५
दिनांक :- १४/०५/२०२५

**Sd/-**
**Additional Commissioner**
**Panvel Municipal Corporation**

## निवडक

### नवी मुंबईत मुलींची बाजी

**नवी मुंबई :** नवी मुंबईचा ९७.३२ टक्के निकाल लागला आहे. नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातून एकूण १५७ शाळांमधून १५ हजार ५०० विद्यार्थीनी परिक्षेसाठी अर्ज केला होता. त्यापैकी १५ हजार ४६४ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. त्यातून १५ हजार ५० विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. यंदा परीक्षेला बसलेल्या मुलांची संख्या जरी अधिक असली तरी उत्तीर्ण होणाऱ्या मुलींची टक्केवारी अधिक असल्याने यंदा देखील मुलींनीच बाजी मारली आहे. नवी मुंबईत ९८.०९ टक्के मुली उत्तीर्ण झाल्या असून ९६.६१ टक्के मुले उत्तीर्ण झाले आहे.

### युरो स्कूलचे विद्यार्थी टॉपर

**नवी मुंबई :** युरो स्कुल ऐरोलीची जेड रो ही विद्यार्थीनी आयसीएसई बोर्ड रिझल्ट्समध्ये ९९.८ टक्के मिळवत नॅशनल रँकर ठरली आहे. युरोस्कूलचे मुंबईत ठाणे आणि नवी मुंबईतील ऐरोली येथे कॅम्पस असून त्यांनी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ आयसीएसई (इयत्ता दहावी), आयसीएसमध्ये (इयत्ता बारावी) १०० टक्के रिझल्ट साध्य केला आहे.

### नेरूळमध्ये बुद्ध जयंती साजरी



**नवी मुंबई :** तथागत भगवान गौतम बुद्ध यांची २५६९ वी जयंती नेरूळ येथील कपिलवस्तू बुद्धविहारात मोठ्या धार्मिक वातावरणात साजरी करण्यात आली. या वेळी प्रारभी, कपिलवस्तू बुद्ध विहार समिती सरचिटणीस एल आर गायकवाड यांच्या हस्ते पंचशील ध्वजारोहण करण्यात आले. बुद्ध पौर्णिमेनिमित्त मोफत रक्त तपासणी शिबिर घेण्यात आले. बुद्ध जयंती सोहळा साजरा करण्यासाठी सविता भिसे, कांचन गाडे, कविता कांबळे, उज्वला पवार, अनंत पवार, अनंत तांबे, सुनील गाडे आदींनी मोलाचे सहकार्य केले.

### छत्रपती संभाजी महाराजांना अभिवादन



**पनवेल :** महानगरपालिकेच्या मुख्यालयात बुधवारी (दि.१४) छत्रपती संभाजी महाराज जयंती निमित्ताने त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या वेळी उपायक्त स्वरूप खारगे, मुख्य लेखाधिकारी मंगेश गावडे, मुख्य लेखा परीक्षक निलेश नलावडे, लेखाधिकारी संग्राम व्होरकाटे, उपअभियंता राजेश कर्डिले, सचिव अक्षय कदम, मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. राजू पाटोदकर, सामान्य प्रशासन विभाग प्रमुख अमर पाटील, पालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



**पनवेल : येथील प्रभाग क्रमांक १९मध्ये नालेसफाई कामांना सुरुवात झाली आहे. महाराष्ट्र बँक, डॉ. आंबेडकर भवन, भाजी मार्केट, दुर्गामाता मंदिर, कोळीवाडा येथील रस्त्यांवरील नालेसफाई करण्यात येत आहे. या कामांची पाहणी माजी नगरसेविका दर्शना भोईर, आरोग्य अधिकारी महेंद्र भोईर, उमेश शेट्टे आदींनी केली.**

# राष्ट्रीय महामार्गावरील कंटेनर हटवले

**उरण : रामप्रहर वृत्त**

जेएनपीए बंदर आणि उरणला जोडणाऱ्या दोन्ही राष्ट्रीय महामार्गावरील जड कंटेनर वाहने हटविण्यात आली आहेत. त्यामुळे या दोन्ही मार्गांनी मोकळा श्वास घेतला आहे. परिणामी मार्गावरील दुचाकी व लहान वाहनचालकांना दिलासा मिळाला आहे. यासंबंधीचे वृत्त प्रसिद्ध झाल्यानंतर प्रशासनाने त्याची दखल घेत कार्यवाही केली.



या मार्गावर उभी करण्यात येणाऱ्या जड कंटेनर वाहनांमुळे होणाऱ्या अपघातात अनेकांचा बळी गेला आहे. या विरोधात उरणमधील सामाजिक संस्थांनी नवी मुंबई वाहतूक विभागाला निवेदन देताच नवी मुंबई वाहतूक उपायुक्तांनी जेएनपीएमध्ये बैठक घेऊन जड वाहने हटवून मार्ग मोकळे करा; अन्यथा कारवाई करू अशी तंबी दिली होती. त्यानंतर उरणच्या वाहतूक विभागाने मुख्य व सेवा मार्गावरील कंटेनर वाहने हटविण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे हे मार्ग मोकळे होऊ लागले आहेत.

जेएनपीए बंदरातून दररोज १५ हजारापेक्षा अधिक जड कंटेनर वाहने उरणच्या जेएनपीए बंदर ते पळस्पे व जेएनपीए ते आम्रमार्ग नवी मुंबई या दोन्ही राष्ट्रीय महामार्गावरून वाहतूक करीत आहेत. यातील अनेक वाहने बेदरकारपणे वाहतूक करतात. याचा फटका या मार्गावरून प्रवास करणाऱ्या दुचाकी व हलक्या वाहनांना बसतो.

> **उरणमधील जासई, भेंडखळ तसेच द्रोणागिरी परिसरातील मार्गावर उभी करण्यात येणारी कंटेनर वाहने हटविण्यात आली आहेत. त्यासाठी मेगा माईकचा वापर करून सूचना दिल्या जात आहेत.**
>
> **-अतुल दहिफळे, पोलीस निरीक्षक, उरण वाहतूक विभाग**

# पंचायतन मंदिराचा वर्धापन दिन सोहळा उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जे.एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्थेच्या नढाळ येथील श्रीक्षेत्र पंचायतन मंदिराचा तृतीय वर्धापन दिन सोहळा मोठ्या उत्साहात साजरा झाला. या वेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर व त्यांच्या सुविद्य पत्नी शकुंतला ठाकूर, खासदार धैर्यशील पाटील, आमदार प्रशांत ठाकूर, भाजप रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी आदींची उपस्थिती लाभली.





पनवेलचे माजी नगराध्यक्ष जे.एम.म्हात्रे यांच्या संकल्पनेतून जे.एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्थेच्या माध्यमातून पंचायतन मंदिर, नढाळ वाडी, चौक येथे १३ मे २०२२ रोजी या मंदिरांचा भव्यदिव्य असा प्राणप्रतिष्ठा सोहळा करून स्थापना करण्यात आली होती.

मयुरेश्वर गणेश, संकटमोचन हनुमान, साईबाबा, भवानी माता आणि नढाळेश्वर महादेव या पाच मंदीरांचे भव्य-दिव्य असे आध्यात्मिक संकुल उभारण्यात आले आहे. यावर्षी मंदिराचा तिसरा वर्धापन दिन सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. या सोहळ्यात हरिपाठ, श्रीं ची पालखी मिरवणूक दिंडी सोहळा, संगीत भजन अशा विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

या वेळी महाराष्ट्र विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णासाहेब बनसोडे, पनवेल पंचायत समिती माजी सभापती काशिनाथ पाटील, कृ.ऊ.बा.स. समिती सभापती नारायण घरत, भाजप ज्येष्ठ नेते नंदकुमार पटवर्धन, खालापूर नगराध्यक्ष शिवानी जंगम, संतोष जंगम, माजी नगरसेवक, नगरसेविका आदी उपस्थित होते.



**नवी मुंबई : भाजपचे नवनियुक्त जिल्हाध्यक्ष डॉ. राजेश पाटील यांचे आमदार मंदा म्हात्रे यांनी अभिनंदन केले. या वेळी माजी पोलीस पाटील दिलीप पाटील, प्रमोद घरत, बेलापूर मंडळ अध्यक्ष अजय सिंग, सीवूड्स-करावे मंडळ अध्यक्ष सुधीर जाधव, नेरूळ (पूर्व) मंडळ अध्यक्ष कुणाल महाडिक, नेरूळ (पश्चिम) मंडळ अध्यक्ष भास्कर यमगर, सानपाडा-जुईनगर मंडळ अध्यक्ष सुनील कुरकुटे, तुर्भे मंडळ अध्यक्ष पंकज आंबीरकर, वाशी मंडळ अध्यक्ष विकास सोरटे आदी उपस्थित होते.**

# बीसीटी विद्यालयाचा दहावीचा निकाल ९८.६५ टक्के

**उरण : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या उरण तालुक्यातील द्रोणागिरी येथील श्रीमती.भागुबाई चांगु ठाकूर (बीसीटी) विद्यालयाचा दहावीचा निकाल ९८.६५ टक्के लागला आहे.

सन २०२४-२०२५ मध्ये विद्यालयातील एकूण ७४ विद्यार्थी दहावी परीक्षेस प्रविष्ट झाले. त्यापैकी ७३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. यात प्रथम श्रुष्टी संतोष यादव ९३.४० टक्के, द्वितीय सिद्धी सनिदेव पार्टे ९३.२० टक्के, व तृतीय स्वेद सतिश म्हात्रे ९२.४० टक्के हे विद्यार्थी आले आहेत.



या यशाबद्दल शाळेचे चेअरमन चंद्रकांत घरत यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. शाळेच्या मुख्याध्यापिका अनुराधा काठे, शालेय व्यवस्थापन समितीच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी तसेच पालक शिक्षक संघाच्या सदस्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# 'आगरी पेठा'ला पसंती

**उरण : प्रतिनिधी**

नाटच कलाकृतीच्या माध्यमातून आगरी बोलीभाषेचा गोडवा जपण्याचा आमचा हा साजेसा प्रयत्न आहे असे प्रतिपादन नाटककार हसूराम पाटील यांनी नाट्यप्रयोगाच्या उद्घाटनावेळी पनवेल येथे केले.

तालुक्यातील अष्टगंध कला मंचाच्या वतीने आगरी पेठा या नाटकाचे सादरीकरण पनवेल येथील वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात मोठ्या दिमाखात करण्यात आला. या प्रयोगाला ग्रामीण भागाबरोबर शहरी भागातील रसिकांचा उदंड प्रतिसाद लाभला. त्यामुळे नाट्यगृह खचाखच भरून गेले होते. हा नाट्य प्रयोग पाहून शहरी भागातील प्रेक्षक भारावून गेले. अष्टगंध कला मंचाचे सचिव दत्तात्रेय घरत व सहचारिणी शुभांगी घरत यांचे या प्रयोगाला मोलाचे सहकार्य लाभले असून, त्यांच्या प्रमुख उपस्थितीत या प्रयोगाचे उद्घाटन झाले.आगरी पेठा हि नाट्यकलाकृती नाटककार रंजन कान्हा ठाकूर यांच्या लेखणीतून उतरली आहे. नाटकाचे दिग्दर्शन नाटककार धनेश्वर म्हात्रे व प्रसाद कडू यांचे आहे.आगरी रूढी परंपरेवर हे नाटक आधारित असून, आगरी बोलीभाषेचा गोडवा आणि तेवढाच तिखटपणा या आकृतीबंध नाटकातून प्रेक्षकांना अनुभवायला मिळाला.

आनंद कुबल यांच्या प्रासंगिक संगीताने नाटकाची उंची वाढविली. नाटकात हसूराम पाटील, अशोक म्हात्रे, कृष्णकांत म्हात्रे, चेतन पाटील, निकिता पाटील, योगेश ठाकूर, जयकिसन मोकल, दिगंबर कोळी, प्रसाद कडू, रोशन घरत, परीशा सरोदे, वैशाली मोहिते, ममता, रुचिता म्हात्रे, अलंकार कडू व बालकलाकार रोनक आदी कसलेल्या कलाकारांनी आपल्या अभिनयातून भूमिका बजावल्या असून, त्यांच्या भूमिकांमधून त्यांच्या अभिनयाच्या छटा पहावयास मिळाल्या. दत्तात्रेय घरत, प्रज्योत पाटील, अशोक म्हात्रे, समीर कोळी, रमेश कोळी आदींचे सहकार्य लाभले.

# दरपत्रकांबाबत आवाहन

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

विभागीय माहिती कार्यालयातील संगणक पाच, लॅपटॉप एक, प्रिंटर पाच यांच्या देखभाल व दुरुस्तीसाठी विहीत पध्दतीचा अवलंब करुन दरपत्रक मागविण्यात येत आहेत. संगणक, लॅपटॉप, प्रिंटर पाहण्यासाठी १५ ते २१ मे २०२५ या कालावधीत शनिवार-रविवार व इतर सार्वजनिक शासकीय सुट्टीचे दिवस सोडून कार्यालयीन वेळेत पाहण्यासाठी उपलब्ध असतील.

इच्छुकांनी कार्यालयीन वेळेत आपले सिलबंद लिफाफ्यावर संगणक देखभाल दुरुस्तीसाठी दरपत्रक असे लिहून सिलबंद लिफाफा विभागीय माहिती कार्यालय, कोकण भवन, तिसरा मजला रुम नंबर ३१७, बेलापूर, नवी मुंबई येथे बुधवार दि.२१ मे २०२५ पर्यंत जमा करावे, असे आवाहन कोकण विभागाचे उपसंचालक (माहिती) यांनी केले होते आहे.

# खारपाटील विद्यालयामध्ये दहावीत मुलींची बाजी

**उरण : वार्ताहर**

चिरनेर येथील पी.पी. खारपाटील एज्युकेशन सोसायटीच्या परशुराम धाकू खारपाटील माध्यमिक विद्यालयातील मराठी माध्यमातील विद्यार्थ्यांनी आणि ठकुबाई परशुराम खारपाटील इंग्रजी माध्यमातील विद्यार्थ्यांनी दहावीच्या परीक्षेत यश संपादन केले.



इंग्रजी माध्यम विद्यालयाचा शेकडा निकाल शंभर टक्के तर मराठी माध्यम विद्यालयाचा शेकडा निकाल ९४.९३ टक्के इतका लागला आहे. इंग्रजी माध्यमात प्रथम मानसी जोशी हिने ९१.६० टक्के, सानवी मोकल हिने ९१ टक्के गुण मिळवून द्वितीय, मोनिका पडवळ हिने ९०.६० टक्के गुण मिळवून तृतीय, चैतन्य भोईर याने ८९.४० टक्के गुण मिळवून चौथा आला. वैद्यही महाडिक हिने ८९ टक्के गुण मिळून पाचवी आली.

मराठी माध्यमातून प्रथम भूमिका ठाकूर हिने ९५.२० टक्के, पायल पाटील हिने ९०.२० टक्के गुण मिळवून शाळेत दुसरी, प्रेरणा पाटील हिने ८९.४०% तिसरी, श्रेया खारपाटील हिने ८७.६०% गुण मिळवून चौथी आली. प्रज्ञेश म्हात्रे याने ८५.६० टक्के गुण मिळवून पाचवा आला.

# महिलांच्या आरोग्यासाठी सकारात्मक विचार महत्त्वाचे -डॉ. चौतमोल

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जागतिक मातृदिनाचे औचित्य साधून परिणिता इव्हेंट्स प्लॅनर, ड्रीम डेव्हलपर्स आणि ग्रेसफुल हँड्स ट्रस्ट ई-१४३२ यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि.११) स्पाइस वाडी हॉटेल नवीन पनवेल येथे 'हार्टवॉर्मिंग सुपर मॉम कॉन्टेस्ट २०२५' हा 'मदर्स डे इव्हेंट' आयोजित करण्यात आला होता. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून पनवेल महानगरपालिकेच्या माजी महापौर डॉ. कविता चौतमोल उपस्थित होत्या. त्यांनी महिलांना मार्गदर्शन करताना महिलांचे आरोग्य आणि निरोगीपणाचे महत्त्व आपल्या मनोगतातून अधोरेखित केले.

अर्थशास्त्र विषयाच्या व्याख्याता, सामाजिक कार्यकर्त्या पायल मधोक यांनी व ग्रेसफुल हँड्स ट्रस्ट ई-१४३२ फाउंडेशनच्या अध्यक्षा नॅन्सी कुकरेजा यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

मातृत्वाचा प्रवास हा एक खास प्रवास आहे आणि तो आनंद आणि जबाबदारी दोन्हीसह येतो असे सांगून नियमित व्यायाम, संतुलित आहार, पुरेसा आराम आणि सकारात्मक विचार हे महिलांच्या आरोग्यासाठी खूप महत्त्वाचे असल्याचे डॉ. चौतमोल यांनी सांगितले.










## निवडक

### दहावीत रोह्याचा निकाल ९६.५४ टक्के

**रोहे :** तालुक्यात २०२४.२०२५ या शैक्षणिक वर्षात १७९३ विद्यार्थी २०२५ ला दहावीसाठी परीक्षेसाठी बसले होते. यामध्ये डिस्टिंक्शन ४०७, फर्स्ट क्लास ७६४, सेकंड क्लास ४३९, पास ६८ विद्यार्थी झाले आहेत. एकूण पास १७३१ विद्यार्थी झाले असून यावर्षीचा रोहा तालुक्याचा निकाल ९६.५४ टक्के लागला आहे. रोहा तालुक्याचा एसएससी २०२५ चा निकाल समाधानकारक लागला असून यशस्वी विद्यार्थ्यांचे गटशिक्षणाधिकारी मेघना धायगुडे, विद्यालयाचे चेअरमन, संचालक, मुख्याध्यापक, शिक्षक, पालक, विद्यार्थी यांनी अभिनंदन केले आहे.

### अंतरा नात्की सर्वप्रथम

**मुरुड :** दहावीच्या निकालात ९० टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळवून मुरुड शहरातील नवाब कालीन शाळेने आपले नावलौकिक अबाधित ठेवले आहे. प्रथम अंतरा कैलास नात्की ९०.६० टक्के, द्वितीय अनन्या नितीन डोंगरीकर ८९.६० टक्के, तृतीय आर्या शैलेश माळी ८६.०० टक्के, चतुर्थ ऋतिका राकेश सुर्वे ८५.२० टक्के, पाचवा सायली दिलीप सारले ८४.८० टक्के सर्व विद्यार्थिनी यांनी गुण क्रमांक अग्रेसर ठेवण्यात यशस्वी वाटचाल केली आहे. सर. एस. ए.हायस्कूलचा एकूण निकाल ९७.१८ टक्के एवढा लागला आहे. इयत्ता दहावीमध्ये १४२ मुलांपैकी १३८ पास झाले आहेत. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक होत आहे.

### अद्वैत शिंदेला ९५.६० टक्के गुण

**चौक, मोहोपाडा :** खालापूर तालुक्यातील वावंढळ येथील



उद्योजक व गायक अनिल शिंदे यांचा पुतण्या अद्वैत समीर शिंदे याने एस.एस.सी.परीक्षेत ९५.६० टक्के गुण प्राप्त करून उत्तीर्ण झाल्याने त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. के. इ. एस. आय. ए.डब्ल्यू. इंग्लिश मिडीयम शाळा पनवेल चा विद्यार्थी असून अतिशय मेहनत व चिकाटीने हे यश मिळाले असल्याचे त्याने सांगितले. वाचन आणि क्रिकेट खेळात तो सहभागी असतो, आपण प्रशासकीय क्षेत्रात येण्याचे स्वप्न असून त्या माध्यमातून सर्व सामान्य जनतेची सेवा करण्याची संधी उपलब्ध करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

### शौर्या, भूमिका महाडमधून प्रथम



**महाड :** महाडमधील शौर्या पाटील व भूमिका वंगवाड या दोघांनी ९७ टक्के गुण मिळवून महाड तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. दरम्यान भाजपचे बिपीन महामुणकर व पदाधिकारी यांनी यशस्वी विद्यार्थींचे अभिनंदन केले. महाड तालुक्यात के ई एस या शाळेची शौर्या विनय पाटील व थरवळ महाविद्यालयाची भूमिका वंगवाड यांनी ९७ टक्के गुण मिळवत प्रथम येण्याचा मान मिळवला.

### मोर्बा एस.एस. हायस्कूलचे सुयश


**माणगाव :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळातर्फे मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या दहावी शालांत परीक्षेचा निकाल मंगळवार दि. १३ मे २०२५ रोजी ऑनलाईन जाहीर झाला. या परीक्षेत माणगाव तालुक्यातील मोर्बा येथील मोर्बा सोशल सोसायटीच्या एस. एस. हायस्कूल मोर्बा या शाळेच्या उर्दू माध्यमाचा एकूण निकाल १०० टक्के तर मराठी माध्यमाचा एकूण निकाल ९०.२८ टक्के इतका लागला असून शाळेने आपल्या उज्वल यशाची परंपरा कायम ठेवली आहे.

### नज ॲकॅडमीचा निकाल १०० टक्के

**मुरुड :** तालुक्यातील मजगावच्या नज ॲकॅडमीने शंभर टक्के निकालाची परंपरा दहावी शालांत परीक्षेतही कायम राखली असून बारावीच्या निकालानंतर दहावीचा निकालही शंभर टक्के लागला आहे. इयत्ता बारावी वाणिज्य शाखेत ९३ टक्के गुण मिळवून या शाळेची विद्यार्थिनी सर्वप्रथम आली होती. या शाळेची विद्यार्थिनी स्वरा सोमप्रकाश राऊळ ९७ टक्के गुण मिळवून विद्यालयासह तालुक्यात पहिल्या क्रमांकाने उत्तीर्ण झाली आहे. सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष व सर्व संचालक, मुख्याध्यापक, शिक्षक व कर्मचार्यांनी अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या.

### सिद्धी सातपुते 'बीएएमएस' उत्तीर्ण

**रोहे :** येथील पत्रकार संतोष सातपुते व शिक्षिका श्वेता



संतोष सातपुते यांची सुकन्या सिद्धी संतोष सातपुते हि बी.ए.एम.एस. डॉक्टर मुंबई विद्यापीठाच्या बी.आर.हर्णे आयुर्वेदिक महाविद्यालय वांगणी बदलापूर येथून ही परीक्षा उच्च गुण मिळवून उत्तीर्ण झाली आहे. तिचा भाऊ यश संतोष सातपुते हा देखील नाशिक येथे बी.डी. एस. (डेंटिस्ट)चे शिक्षण घेत आहे तर सिद्धी ही बी.ए.एम.एस. परीक्षा उच्च गुणांनी उत्तीर्ण झाली असुन. शिंपी समाजातील मुलगी आहे फक्त शिंपी समाजाचेच नाही तर संपूर्ण रोहा परिसरातील नाव रोशन केले आहे.



**माणगाव : छत्रपती शाहू महाराज जन्मस्थळ वैजनाथ महादेव मंदिर गांगवली येथे कुंभार समाजाकडून श्री छत्रपती थोरले शाहू महाराज पुरस्कार डॉ. गौरव घोडे यांना प्रदान करण्यात आला.**

# श्रीवर्धन तालुक्यातील मच्छीमार चिंतेत

## भिलजे माशांना भाव नाही, जाळीचे कामही किचकट



**भिलजे माशांचा बहर असला तरी मच्छिमारांच्या आयुष्याचा कडवट वास्तव अजूनही बदललेला नाही. समुद्राच्या लाटा त्यांना आशा देतात, पण बाजारातील अस्थिरता त्यांची आशा हिरावून घेत आहे. शासनाने आणि संबंधित यंत्रणांनी वेळेत पावले उचलली नाहीत, तर 'भिलजे'सारखा सोनेरी मासादेखील श्रीवर्धनच्या मच्छिमारांना उपासमारीच्या वाटेवर नेतोय हे वास्तव नाकारता येणार नाही.**
**–नामदेव पाटील, मच्छीमार**

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन तालुक्याच्या किनारपट्टीवर सध्या भिलजे माशांचा हंगाम चांगलाच बहरलेला आहे. या शुभ्र, चविष्ट व उच्च प्रतीच्या माशांना देशभरातील बाजारपेठांमध्ये मोठी मागणी आहे. विशेषतः गोवा, पुणे, मुंबई व नाशिकसारख्या ठिकाणी हे मासे चटकदार चवेमुळे व मद्याच्या जोडीला घेतले जाण्यामुळे अधिक लोकप्रिय ठरतात, मात्र एवढी लोकप्रियता असूनही श्रीवर्धनच्या मच्छिमारांच्या चेहऱ्यावर सध्या नाराजीचे सावट आहे.

भिलजे मासे पकडण्यासाठी मच्छिमारांना फार मेहनत करावी लागते. या मास्यांसाठी लागणारी जाळी अतिशय नाजूक, लहान व खास प्रकारची असते. ही जाळी तयार करण्यासाठी अनेक दिवस लागतात, आणि ती हाताळताना सावधगिरी बाळगावी लागते. कारण समुद्रात जर पाण्याचा वेग वाढला अथवा जाळीत जड वस्तू अडकली, तर ती सहज फाटू शकते.

मच्छिमार पहाटे चार ते पाचच्या सुमारास समुद्रात उतरतात. मासे पकडून परतल्यानंतर संपूर्ण जाळी किनाऱ्यावर आणली जाते आणि ती हलवून भिलजे मासे वेगळी केली जातात. हे मासे दिसायला पांढरे शुभ्र, मऊ आणि चवदार असल्यामुळे ग्राहक त्यावर तुटून पडतात.



### उपजीविकेवर होतोय परिणाम

***भिलजे मासे पकडण्यासाठी आम्हाला पहाटेपासून समुद्रात उतरावे लागते आणि खूप मेहनत घ्यावी लागते, मात्र एवढा माल पकडून आणल्यानंतर बाजारात त्याला योग्य दर मिळत नाही. त्यामुळे आमच्या मेहनतीचा योग्य मोबदला न मिळाल्याने आम्ही नाराज आहोत. दर घसरण्यामुळे उपजीविकेवर परिणाम होत आहे.***

सध्या श्रीवर्धन तालुक्यात भिलजे माशांची मोठ्या प्रमाणावर आवक होत आहे. यामुळे व्यापाऱ्यांनी दर कृत्रिमरीत्या पाडल्याचे दिसून येते. मासे गोवा, मुंबई, पुणे आणि नाशिक येथे बर्फात साठवून पाठवले जातात, मात्र स्थानिक मच्छिमारांना त्यांच्या मेहनतीचे योग्य मूल्य मिळत नाही. व्यापाऱ्यांचा दरपाड हा फक्त आर्थिक फटका नाही, तर मच्छिमारांच्या कष्टाला नाकारलेली किंमत आहे. त्यामुळे मच्छिमारांमध्ये प्रचंड नाराजी पसरली आहे.

श्रीवर्धन तालुक्यातील जीवना बंदर, मुळगाव कोळीवाडा, आदगाव, दिघी दांडा व अन्य भागांतील मच्छिमार या हंगामावरच आपली उपजीविका अवलंबून ठेवतात. काही दिवसांत मासेमारी बंदी लागू होणार असून त्यानंतर पावसाळ्यामुळे मासेमारीस थांबा लागतो. त्यामुळे या काहीच दिवसांत मिळणारे उत्पन्न हे त्यांच्या भविष्यासाठी अत्यंत महत्त्वाचे असते, परंतु सध्या बाजारात दर घसरलेले असल्यामुळे भिलजे मासे कवडीमोल दरात विकले जात आहेत. शासनाकडून किंवा सहकारी संस्थांकडून योग्य सहकार्य न मिळाल्याने हा पारंपरिक व्यवसाय अडचणीत सापडला आहे.

मच्छिमारांना त्यांच्या मालाचा योग्य दर मिळावा यासाठी स्थानिक पातळीवर दरनियंत्रण, थेट ग्राहकांशी विक्री व्यवस्था, शीतगृह व साठवणूक यंत्रणा निर्माण करणे आवश्यक झाले आहे. अन्यथा दरवर्षी असेच नुकसान होणार असून पारंपरिक मासेमारी व्यवसायावर संकट ओढवण्याची शक्यता आहे.

# धाटाव येथे मॉक ड्रिल



**रोहे, धाटाव : प्रतिनिधी**

भारत-पाकिस्तान युद्धामुळे निर्माण झालेल्या युद्धजन्य परिस्थिती अनुषंगाने मंगळवारी (दि.१३) दुपारी ३ ते ४ चे सुमारास रोहा पोलीस ठाणे हद्दीतील धाटाव येथील मर्मस्थळ याठिकाणी मॉकड्रिल घेण्यात आली.

मर्मस्थळ येथील कार्यकारी उपअभियंता यांनी कळविले मर्मस्थळ येथील कंट्रोल रूम मध्ये चार बंदुकधारी व्यक्ती घुसले असुन अंधाधुंद गोळीबार करीत आहेत तसेच कंट्रोल रूममधील रोहा शहर, डाटा औद्योगिक क्षेत्रामध्ये सप्लायर होणाऱ्या इलेक्ट्रिक वायरी तोडफोड करीत आहेत. असे कळविल्याने रोहा पोलीस निरीक्षक मारुती पाटील व पोलीस ठाण्याकडील स्टाफ व आरसीपीचे ३२ जवान घटनास्थळी रवाना झालो व घटनास्थळी फायर ब्रिगेड यांना सुद्धा पाचारण करण्यात आले आरसीपी जवान यांना प्रवासात सर्व हकीकत सांगुन प्लान समजून सांगितला.

घटनास्थळी पोहचल्यानंतर मर्मस्थळ येथील वाल कंपाऊंटद्वारे आम्ही व हत्यार धारक जवान यांनी आत मध्ये प्रवेश करून मर्मस्थळ कंट्रोल रूम मध्ये चोर वाटे द्वारे प्रवेश करुन अंधाधुंद गोळीबार करणारे इसम यांना ताब्यात घेतले. सदर घटने बाबत तहसीलदार रोहा, उपजिल्हा रुग्णालय रोहा वानविभाग रोहा यांना घटने बाबत माहिती कळविण्यात आले. उप विभागीय पोलीस अधिकारी रवींद्र दौंडकर हे घटनास्थळी हजर झाले. त्यानंतर परिस्थिती नुसार मर्मस्थळाचा ताबा घेऊन परिसरातील संशयित इसम यांना ताब्यात घेऊन जखमी यांना वैद्यकीय अधिकारी यांचे मदतीने उपचारा करिता पाठविण्यात आले आहे. अश्या प्रकारे ४ वाजता ही मॉक ड्रिल समाप्त करण्यात आली आहे.

मॉक ड्रिलकरिता रोहा पोलीस ठाणे १ पोनि, १५ कर्मचारी, वानविभाग रोहा १ अधिकारी, १० कर्मचारी, आरसीपी प्लाटून माणगाव ३० कर्मचारी, तहसील कार्यालय १ नायब तहसीलदार,५ कर्मचारी, नगर परिषद मुख्याधिकारी व ५ कर्मचारी, उपजिल्हा रुग्णालय रोहा १ वैद्यकीय अधिकारी स्टाफ व ३ ऍम्ब्युलन्स, अग्निशमन दल धाटाव कंपनी कडील वाहन व स्टाफ हे मॉक ड्रिल मध्ये सहभागी करण्यात आला आहे. मॉकड्रिल समाप्त झाल्यानंतर हजर अधिकारी, कर्मचारी, दुकानदार, भाविक, यांना युद्धजन्या परिस्थिती दरम्यान, करण्यात येणाऱ्या उपाययोजनांबाबत माहिती देण्यात आली.

# तळ्याच्या वेदक विद्यामंदिरचा दहावीचा निकाल १०० टक्के

**तळा : प्रतिनिधी**

तळे शिक्षण प्रसारक मंडळाचे श्री.गोपिनाथ महादेव वेदक विद्यामंदिर तळ्याचा दहावीचा निकाल १०० टक्के लागला आहे.

गो म वेदक विद्यालयाची एकूण ७५ विद्यार्थी प्रविष्ट होते पैकी ७५ विद्यार्थी उत्तीर्ण होऊन शाळेचा १०० टक्के निकाल लागला असून जान्हवी रमेश साळवे ९२.४० टक्के गुण मिळवून शाळेत प्रथम आली आहे. संस्कृती विजय ठसाळ ९०.८० टक्के गुण मिळवून द्वितीय आली आहे तर श्रावणी योगेश शिर्के ८९.६० टक्के गुण मिळवून तृतीय आली आहे. निकालामध्ये मुलींनी बाजी मारली आहे.तालुक्यातील ग्रामीण भागातील ही शाळांच्या निकालाची टक्केवारी वाढली असून मुलींनी बाजी मारल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. तालुक्यातील सात शाळांचा निकाल १०० टक्के लागला आहे.त्यामधे माध्यमिक शाळा उसर खुर्द, गो.म.वेदक विद्यामंदिर तळा, माध्यमिक शाळा म्हसाडी, माध्यमिक शाळा पढवण,उर्दू हायस्कूल तळा, माध्यमिक शाळा पन्हेळी, माध्यमिक शाळा बोरघरहवेली व पाच शाळांचा निकाल ८५ टक्क्यांच्या पुढे लागला आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

# पोलिसांच्या सतर्कतेमुळे आत्मदहनाचा प्रयत्न टळला

**महाड : प्रतिनिधी**

महाडमध्ये मटका, जुगार, भिंगरूट अशा प्रकारचे अवेध व्यवसाय सुरू असून पोलिसांनी याला बंद करावेत नाही तर प्रशासनाच्या विरोधात आत्मदहन करणार असल्याचा इशारा समाज सेवक सुभाष मोरे यांनी दिला होता. त्या प्रमाणे त्यांनी मंगळवारी १२ वाजता महाड शहर पोलीस ठाणे हद्दीत अंगावर डिझेल ओतून आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला असता पोलिसांच्या सतर्कते मुळे अनर्थ टळला.

महाड तालुक्यामध्ये मटका, जुगार, भिंगरूट अशा प्रकारचे अवैध व्यवसाय सुरू



असून हे पोलीस प्रशासनाने बंद करावेत अशी मागणी सातत्याने समाज सेवक सुभाष मोरे यांनी करून देखील पोलिसांच्या आशीर्वादाणे हे सुरूच राहिले. जर हे बंद झाले नाहीतर आज महाड शहर पोलीस ठाणे हद्दीत दुपारी १२ वाजता आत्मदहन करण्याच्या इशारा त्यांनी दिला होता. त्या प्रमाणे ते हातात डिझेल ने भरलेला कॅन घेऊन पोलीस ठाणे हद्दीत येऊन आपल्या अंगावर डिझेल ओतुन पेटवून घेण्याचा प्रयत्न केला मात्र पोलीस प्रशासनाला अगोदरच याची खबर असल्याने त्यांनी धाव घेत पेटवून घेण्या अगोदरच त्याला ताब्यात घेतले. पोलिसांच्या सतर्कते मुळे अनर्थ टळला.

महत्त्वाचे म्हणजे महाड शहर पोलीस स्टेशन मधील इतिहासातील पहिलीच आत्मदहन करण्याची घटना आहे. या घटनेनंतर महाड शहर पोलीस ठाणे मध्ये नगर पालिका मुख्याधिकारी पोलीस निरीक्षक संतोष जाधव नगर पालिका अभियंता आणि सुभाष मोरे यांची बैठक झाली आणि यांच्या मागनिनुसार पुढील कारवाईचे आश्वासन महाड शहर पोलीस ठाण्याचे अधिकारी संतोष जाधव यांनी दिली आहे.

# साबळे विद्यालयाचे 'शंभर नंबरी' यश

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगांव शिक्षण प्रसारक मंडळाच्या अशोकदादा साबळे विद्यालयाने आपल्या नेत्रदीपक यशाची परंपरा कायम ठेवली आहे. या शाळेचा दहावी परीक्षेचा एकूण निकाल १०० टक्के इतका लागला असून शांती देवीलाल मावत या विद्यार्थिनीने ९०.६० टक्के इतके गुण संपादन करून शाळेमध्ये सर्वप्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होण्याचा मान मिळविला आहे.

या शाळेमधून साक्षी भाऊसाहेब घोरपल्ले या विद्यार्थिनीने ९० टक्के गुण संपादन करून द्वितीय क्रमांक, सांची शिवशंकर मुंडे या विद्यार्थिनीने ८९.६० टक्के गुण संपादन करून तृतीय क्रमांक, निरंजना संजय कदम या विद्यार्थिनीने ८८.४० टक्के गुण संपादन करीत चतुर्थ क्रमांक, केदार भानुदास बिरादार या विद्यार्थ्याने ८८.२० टक्के गुण संपादन करीत पाचवा क्रमांक पटकावत शाळेच्या यशामध्ये मानाचा तुरा रोवला आहे.

# श्रद्धा इंग्लिश मीडियम स्कूलचा १०० टक्के निकाल

**माणगाव : प्रतिनिधी**

श्रद्धा इंग्लिश मिडीयम स्कूलने आपली उज्वल यशाची परंपरा कायम ठेवीत या शाळेचा दहावी परीक्षेचा एकूण निकाल १०० टक्के इतका लागला असून अक्सा अ.हमीद बंदरकर व मधुरा राजेश सकपाळ या विद्यार्थ्यांनी अनुक्रमे ९१.८० टक्के इतके गुण संपादन करून शाळेमध्ये सर्वप्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होण्याचा मान मिळविला आहे.

या शाळेमधून सिद्धी सुधाकर देवणे या विद्यार्थीनीने ९१.६० टक्के इतके गुण संपादन करून द्वितीय क्रमांक, सुजल उदय भोस्तेकर या विद्यार्थ्याने ८९.४० टक्के इतके गुण संपादन करून तृतीय क्रमांक, मैत्री विनोद साळवी या विद्यार्थीनीने ८९ टक्के इतके गुण संपादन करून चतुर्थ क्रमांक, यश सुरेंद्र शिगवण या विद्यार्थ्याने ८६ .८० टक्के गुण संपादन करून पाचवा क्रमांक पटकावत शाळेच्या यशामध्ये मानाचा तुरा रोवला आहे. या शाळेमधून यावर्षी दहावी परीक्षेसाठी एकूण ३० विद्यार्थी बसले होते हे सर्व विद्यार्थी चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाले आहेत.

# केळकर विद्यालयाचे सुयश

**अलिबाग : प्रतिनिधी**

चेंढरे-अलिबाग येथील चिंतामणराव केळकर विद्यालयाने दहावीच्या परीक्षेत शंभर टक्के निकाल लगण्याची परंपरा कायम राखली आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे फेब्रुवारी-मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या दहावीच्या परीक्षेत या शाळेतील सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. या शाळेचा दहावीच्या परीक्षेत सलग तेराव्या वर्षी शंभर टक्के निकला लागला आहे.

फेब्रुवारी २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या दहावीच्या परीक्षेला चिंतमणराव केळकर विद्यालयाचे १६८ विद्यार्थी बसले होते. हे सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. २७ विद्यार्थ्यांना ९० टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळाले आहेत. मराठी माध्यमात अक्षरा महेश पाटील हीने शाळेत प्रथम येण्याचा मान विळवला. तीने ९४.२० टक्के गुण मिळवले. सेमी इंग्रजी माध्यमात भाविका मनोज कासार शेळेत पहिली आली. तीला ९७.६० टक्के गुण मिळाले. राज अविनाश खरसंबळे याने ९७.६० टक्के गुण मिळवून इंग्रजी मध्यमात शाळेत पहिला येण्याचा मान मिळवला.

# मुरूडच्या नचिकेताज हायस्कूलने शंभर टक्के निकालाची परंपरा जपली!

**मुरुड : प्रतिनिधी**

दहावीच्या परीक्षेत नचिकेताज् हायस्कूल, मुरूडचा निकाल सलगपणे यंदाही १०० टक्के लागला असून, विद्यार्थ्यांनी मेहनतीने आणि आत्मविश्वासाने उत्तम यश संपादन करत शाळेची उज्ज्वल परंपरा कायम राखली आहे. नचिकेतज ही इंग्रजी माध्यम हायस्कूल असून येथे उत्तम शैक्षणिक दर्जा ठेवण्यात आला आहे.

तांबडकर आर्या विनोद ९३.६० टक्के, पाटील स्नेहला प्रीतम ९२.०० टक्के, भोईर श्रेया मनोहर ९०.८० टक्के, बांद्रे कौस्तुभ रुपेश ९०.०० टक्के, काजल सत्येंद्र ८६.६० टक्के, वाडकर दिशा अजय ८६.२० टक्के, कोटविलकर इराम नदीम – ८५.२० टक्के अशी यशस्वी विद्यार्थ्यांची नावे आहेत.

विद्यार्थी गुणगौरवाकरीता शाळेचे संचालक मंगेश मधुकर दांडेकर, संचालिका मुग्धा मंगेश दांडेकर तसेच आराधना मंगेश दांडेकर व शाळेच्या मुख्याध्यापिका प्रियंका व्रिकांत दांडेकर, शिक्षकवृद व पालक उपस्थित होते.

# मोर्बा मॉडर्न स्कूलचा निकाल ९८ टक्के

**माणगाव : प्रतिनिधी**

मोर्बा मॉडर्न इंग्लिश स्कूलने आपली उज्वल यशाची परंपरा कायम ठेवीत या शाळेचा दहावी परीक्षेचा एकूण निकाल ९८ टक्के इतका लागला असून मनाल मजीद राऊत या विद्यार्थिनीने ९०.८० टक्के इतके गुण संपादन करून शाळेमध्ये सर्वप्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होण्याचा मान मिळविला आहे.

या शाळेमधून मोहम्मद जमील अहमद राऊत व मुनीब शमसूलहुदा फिरफिरे या विद्यार्थ्यांनी ९०.२० टक्के इतके गुण संपादन करून अनुक्रमे द्वितीय क्रमांक तर शिफा एजाज धनसे या विद्यार्थिनीने ९० टक्के इतके गुण संपादन करून तृतीय क्रमांक पटकावत शाळेच्या यशामध्ये मानाचा तुरा रोवला आहे. या शाळेमधून यावर्षी दहावी परीक्षेसाठी एकूण ४५ विद्यार्थी बसले होते त्यापैकी ४४ विद्यार्थी चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाले आहेत. त्यामध्ये ३४ विध्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य संपादन केले असून प्रथम श्रेणीत आठ विद्यार्थी, द्वितीय श्रेणीत दोन विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

या शाळेचा दरवर्षी निकाल नेत्रदीपक लागत असल्याने पालकवर्गांमधे तसेच विद्यार्थ्यांमध्ये विशेष आनंदाचे वातावरण असून संस्था पदाधिकारी यांनी शिक्षकांचे खास अभिनंदन होत आहे.





दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com